नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५१ * अंक १६ * * अमरावती * बुधवार, दिनांक १६ जुलै २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## १५० मीटर खोल दरीत कोसळली जीप

### ८ ठार ५ जखमी

■ वृत्तसंस्था, पिथोरागड, दि. १५ :
उत्तराखंडमधील पिथोरागड जिल्ह्यात मंगळवारी संध्याकाळी एक मॅक्स जीप नियंत्रण गमावून १५० मीटर खोल नदीत कोसळली. या अपघातात ८ जणांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये एका शाळकरी मुलीसह ४ महिलांचा समावेश आहे. तर ५ जण जखमी आहेत.
सोनी पुलाजवळ हा अपघात झाला. जीप मुवानीहून बक्ता येथे जात होती. त्यात १३ जण होते. माहिती मिळताच प्रशासनाचे पथक घटनास्थळी पोहोचले. एसडीआरएफ, पोलिस आणि इतर बचाव पथकांनी जखमींना नदीतून बाहेर काढले आणि रुग्णालयात पाठवले.

अग्राग्रलेख

## खरीखरी..

# अंतराळवीर परतले

आपले भारतीय अंतराळ शुभांशू शुक्ला १८ दिवसानंतर पुन्हा पृथ्वीवर परतलेले आहेत. अंतराळात भ्रमण करणे किंवा फिरणे म्हणजे एका प्रकारचे युद्धच असते. सुनीता विल्यम्स ही नासाकडून गेलेली मूळ भारतीय वंशाची महिला अनेक महिने नव्हे तर जवळपास दोन वर्ष अनेक व्यत्ययांमुळे अंतराळात राहिली होती. पण आपले भारतीय अंतराळवीर शुभांशु फक्त १८ दिवसातच परतले, त्यांचे या भूतलावर स्वागत आहे. या १८ च्या आकड्याला मोठे महत्त्व आहे. कुरुक्षेत्रावर महाभारताचे युद्धसुद्धा एकूण १८ दिवसच चालले होते. श्रीमद् भगवद्गीतेचे अध्याय सुद्धा १८ आहेत. विशेष म्हणजे यातील शेवटचा विश्वरूपदर्शन अध्याय आहे. म्हणजेच आपले भारतीय अंतराळवीर खऱ्या अर्थाने विश्वरूप दर्शन करून आले असे म्हटले तर काही वावगे ठरणार नाही. जरा पाठीमागे गेले तर असे लक्षात येईल की, पाकिस्तान सोबत भारताची पहिली लढाई १९६५ सालामध्ये १८ दिवस चालली होती. अशा आणखी अनेक घटनांची नोंद आपल्याला अठराच्या आकड्यासोबत करता येईल. त्यामुळेच अंतराळात जाऊन आपला भारत देश कसा दिसतो, असा प्रश्न आपल्या आदरणीय आणि माननीय पंतप्रधान स्वर्गीय इंदिरा गांधी यांनी तेव्हाच्या अंतराळवीर राकेश शर्मालाविचारला होता. नेमका तोच प्रश्न आपल्या आत्ताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही विचारला. तेव्हा सुद्धा दोन्ही अंतराळवीरांचे उत्तर एकच होते, ते म्हणजे प्रिय आमचा भारत देश किती महान आहे आणि सुंदर आहे, हे आम्ही अंतराळातून पाहत आहोत. म्हणजेच सारे जहाँ से अच्छा हिंदोस्तां हमारा. तसे पाहायला गेले तर अंतराळाची सफर तितकी सोपी नसते, कधीच नसते. त्यासाठी फार मोठी तयारी करावी लागते, आयुष्यातील वषार्नुवर्षे त्या तयारीसाठी द्यावी लागतात. तरीही भारताने याबाबतीत मारलेली मजल निश्चितच आपली मान अभिमानाने उंचावणारी आहे. या अंतराळ भ्रमणामुळे जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रातील अनेक गोष्टी आणि आपल्या मानव जातीतील अनेक लाभदायक गोष्टी आपल्याला स्पष्टपणे कळतात. आपण पृथ्वीवर राहूनही अंतराळाचे अवलोकन केल्यावर आपल्याला त्याच्या भव्य दिव्यपणाची प्रचिती येते आणि आपण कल्पनाही करू शकत नाही, एवढ्या अनंत बाबी दुर्बिणीद्वारे किंवा दुर्बिणीशिवाय आपण अनुभव शकतो. अशा या अंतराळातून परत आलेल्या आपल्या भारत सुपुत्र शुभांशू यांची निरीक्षणे आणि त्यातून होणारे फायदे आपल्या देशासाठी निश्चितच सुखदायी आणि सर्व फलदायी ठरतील यात शंका नाही. भारताने केलेली अंतराळ बाबतची प्रगती सर्वश्रुत आहे, विशेष म्हणजे या प्रगतीमध्ये तथाकथित अत्यंत प्रागतिक देशांनी पुकारलेल्या असहकारामध्येही भारताचे आपले भारतीय वैज्ञानिक आपल्या देशाचा झेंडा उंच फडकवण्यासाठी सदैव कार्यतत्पर असतात, हेच या अंतराळात स्वारीतून दिसून आले आहे. त्यासाठीच अंतराळवीराच्या पाठीमागे जी विज्ञानाची शक्ती आहे तिलाही नमन करूया आणि या शुभ घडीला शुभांशु यांचे पृथ्वीतलावर स्वागत करूया!

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

## २० दिवस अंतराळात राहून

# पृथ्वीवर परतले शुभांशू

### कॅलिफोर्नियाच्या समुद्रात झाली स्पेसक्राफ्टची लँडिंग : ४१ वर्षानंतर अंतराळात गेला होता भारतीय



■ वृत्तसंस्था, कॅलिफोर्निया, दि. १५:
सुमारे २३ तासांच्या प्रवासानंतर, १५ जुलै रोजी दुपारी ३ वाजता ड्रॅगन अंतराळयान समुद्रात उतरले. शुभांशू शुक्ला यांच्यासह चार अंतराळवीर २० दिवस अंतराळात घालवल्यानंतर पृथ्वीवर परतले आहेत.
हे चारही अंतराळवीर एक दिवस आधी सायंकाळी ४:४५ वाजता आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावरून पृथ्वीवर रवाना झाले होते. सर्व अंतराळवीर २६ जून रोजी भारतीय वेळेनुसार दुपारी ४:०१ वाजता आयएसएसवर पोहोचले. २५ जून रोजी दुपारी १२ वाजता ॲक्सियम मिशन ४ अंतर्गत ते निघाले. त्यांनी स्पेसएक्सच्या फाल्कन-९ रॉकेटला जोडलेल्या ड्रॅगन कॅप्सूलमधून केनेडी स्पेस सेंटरमधून उड्डाण केले.
शुभांशू यांच्या परतण्याबद्दल पंतप्रधान मोदी म्हणाले, संपूर्ण देशासह, मी ग्रुप कॅप्टन शुभांशू शुक्ला यांचे त्यांच्या ऐतिहासिक अंतराळ प्रवासातून पृथ्वीवर परतल्याबद्दल स्वागत करतो. शुभांशू यांनी आपल्या समर्पणाने, धाडसाने अब्जावधी स्वप्नांना प्रेरणा दिली आहे. आपल्या स्वतःच्या मानवी अंतराळ उड्डाण मोहिमेच्या दिशेने हा आणखी एक मैलाचा दगड आहे गगनयान.
१४ जुलै रोजी दुपारी २:१५ वाजता क्रू ड्रॅगन अंतराळयानात पोहोचला. दुपारी ४:४५ वाजता आयएसएसच्या हार्मनी मॉड्यूलमधून अंतराळयान अनडॉक झाले. १५ जुलै रोजी दुपारी ३ वाजता कॅलिफोर्नियाच्या किनाऱ्यावर स्प्लॅशडाउन झाले.
शुभांशू यांनी १८ दिवस अंतराळ मोहिमेदरम्यान ६० हून अधिक वैज्ञानिक प्रयोगांमध्ये भाग घेतला. यामध्ये भारतातील सात प्रयोगांचा समावेश होता. त्याने अंतराळात मेथी आणि मूगाचे दाणे वाढवले. त्याने 'स्पेस मायक्रोअल्गी' प्रयोगातही भाग घेतला. त्याने अंतराळात हाडांच्या आरोग्यावरही प्रयोग केले.
६ जुलै रोजी त्यांनी इस्रोचे अध्यक्ष डॉ. व्ही. नारायणन आणि इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या प्रयोगांबद्दल आणि भारताच्या गगनयान मोहिमेतील त्यांच्या योगदानाबद्दल चर्चा केली. शुभांशू यांनी आयएसएसच्या क्युपोला मॉड्यूलमधून पृथ्वीचे अद्भुत फोटो काढले.
शुभांशू शुक्ला पृथ्वीवर परतल्यानंतर वडिलांच्या डोळ्यात आनंदाश्रू तरळले तर आईने देवाचे आभार मानले.

## शरद पवारांनी अखेर भाकरी फिरवली!

### शशिकांत शिंदे नवे प्रदेशाध्यक्ष



■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १५ :
राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी अखेर आज भाकरी फिरवली असून, पक्षाच्या प्रदेशाध्यक्षपदी शशिकांत शिंदे यांची निवड करण्यात आली आहे.
राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची आज बैठक पार पडली. या बैठकीत शरद पवार यांनी शशिकांत शिंदे यांची प्रदेशाध्यक्ष म्हणून घोषणा केली आहे. दरम्यान, मागील तीन दिवसांपासून सुरू असलेल्या प्रदेशाध्यक्ष निवडीच्या आणि जयंत पाटलांच्या चर्चांना आज अखेर पूर्ण विराम लागला आहे.
गेल्या काही दिवसांपासून राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या प्रदेशाध्यक्ष पदाच्या बदलाची चर्चा सुरू होत्या. जयंत पाटील यांनी गेल्या सात वर्षांपासून पक्षाची धुरा सांभाळली. गत १० जून रोजी पक्षाच्या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमात जयंत पाटील पदमुक्त होण्याची इच्छा व्यक्त केली होती. त्यानंतर त्यांच्या राजीनाम्याची चचार्ही सुरू झाली होती.
आज अखेर शशिकांत शिंदे यांची प्रदेशाध्यक्ष म्हणून घोषणा करण्यात आली. आता शशिकांत शिंदे यांच्यावर आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत पक्षाला चांगला विजय मिळवून देण्याची जबाबदारी असणार आहे. शशिकांत शिंदे हे पक्षाच्या स्थापनेपासूनच शरद पवार यांचे खंदे सहकारी राहिले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसमधील बंडखोरीवेळी त्यांनी पवारांची निष्ठेने साथ दिली. प्रभावशाली नेतृत्व म्हणून त्यांची ओळख असून, त्यांना संघटनात्मक कामाचा दांडगा अनुभव आहे.

## टेस्लाचे भारतातील पहिले शोरूम मुंबईत सुरू



■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १५:
महाराष्ट्र राज्य हे जागतिक दर्जाच्या सर्व ईव्ही कंपन्यांसाठी फेव्हरेट डेस्टिनेशन झाले असल्याचा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. या सर्व कंपन्यांच्या गाड्या धावण्यासाठी राज्यातील महामार्ग हे जागतिक दर्जाचे असल्याचा दावा देखील त्यांनी केला आहे. मुंबईमध्ये टेस्लाच्या देशातील पहिल्या शोरूमचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते पत्रकारांशी बोलत होते.
टेस्लाचे पहिले स्टोअर आज मुंबईत उघडले आहे. या कार्यक्रमात, कंपनीने त्यांची कॉम्पॅक्ट क्रॉसओवर इलेक्ट्रिक एसयूव्ही मॉडेल वाय देखील लाँच केली आहे. कंपनीचा दावा आहे की ही कार एकदा पूर्ण चार्ज केल्यावर ५७५ किलोमीटरपर्यंत धावू शकते.
जगातील सर्वात श्रीमंत उद्योगपती एलोन मस्क यांच्या कंपनी टेस्लाचे पहिले शोरूम आज मुंबईतील पॉश वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्समध्ये उघडले. टेस्ला शोरूमच्या उद्घाटन समारंभाला मुख्यमंत्री फडणवीस यांच्यासह परिवहन मंत्री प्रताप सरनाईक देखील पोहोचले होते.
हे स्टोअर लोकांसाठी अनुभव केंद्र म्हणून काम करेल. म्हणजेच, येथे केवळ कार विकल्या जाणार नाहीत, तर लोकांना टेस्लाचे तंत्रज्ञान आणि वैशिष्ट्ये देखील जवळून पाहता येतील. विशेष पाहुणे, उद्योग भागीदार आणि मीडियाचे लोक या कार्यक्रमाला उपस्थित होते. यानंतर, शोरूम

## जबाबदारीने वागा अन्यथा कारवाईचा बडगा...



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १५ :
सत्ताधारी शिवसेनेतील काही मंत्र्यांच्या आणि आमदारांच्या वादग्रस्त वर्तनामुळे पक्षावर टीकेची झोड उठत असताना, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अखेर कडक भूमिका घेत आपल्या मंत्री आणि आमदारांची कानउघाडणी केली आहे.
काही मंत्र्यांना यापूर्वी बदनामीमुळे पद गमवावे लागले. सत्तेची हवा डोक्यात जाऊ देऊ नका, तुमच्यावरही अशी कारवाई करण्याची वेळ येऊ देऊ नका, असा गंभीर इशारा शिंदे यांनी शिवसेनेच्या मंत्री आणि आमदारांना दिला.
गेल्या काही दिवसांत शिवसेनेच्या काही नेत्यांचे कारनामे व्हायरल झाल्याने एकनाथ शिंदे संतापल्याचे बोलले जात आहे.

## निमिषाच्या मृत्यूदंडाची शिक्षा अखेर टळली

■ वृत्तसंस्था, साना, दि. १५ :
येमेनमध्ये मृत्युदंडाची शिक्षा सुनावण्यात आलेल्या केरळच्या परिचारिका निमिषा प्रियाची मृत्युदंडाची शिक्षा सध्यासाठी पुढे ढकलण्यात आली आहे. तिला १६ जुलै रोजी मृत्युदंडाची शिक्षा सुनावण्यात येणार होती. वृत्तसंस्था एएनआयने मंगळवारी सूत्रांच्या हवाल्याने ही माहिती दिली.
मीडिया रिपोर्टनुसार, कार्यकर्ते गट आणि प्रभावशाली धार्मिक नेत्यांनी या प्रकरणात हस्तक्षेप केला, त्यानंतर निमिषा प्रियाची फाशीची शिक्षा पुढे ढकलण्यात आली आहे. निमिषाला मृत्युदंडापासून वाचवण्यासाठी यापूर्वी राजनैतिक पातळीवर अनेक प्रयत्न करण्यात आले होते.
भारतीय परिचारिका निमिषा २०१७ पासून तुरुंगात आहे, तिच्यावर येमेनी नागरिक तलाल अब्दो महदीची हत्या केल्याचा आरोप आहे.

आज झाडणार होते गोळी



## विधानसभेत देसाई विरूद्ध सरदेसाई



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १५ :
विधानसभेत आज वरुण सरदेसाई आणि मंत्री शंभुराजे देसाई यांच्यात जोरदार शाब्दिक चकमक पाहायला मिळाली. मुंबई वांद्रे पूर्व मतदारसंघातील डिफेन्स लँडवरील झोपडपट्टी पुनर्विकास रखडल्याच्या मुद्द्यावरून लक्षवेधी सुरू असताना विरोधक आणि सत्ताधारी आमदार आमने-सामने आले.
विरोधी पक्षाचे आमदार वरुण सरदेसाई म्हणाले, मंत्री महोदयांना ब्रिफींगच केलेलं नाही. सरकारला या प्रश्नाची कल्पनाच नाही. असा टोला लगावताच, मंत्री शंभुराजे देसाई भडकले. त्यांनी थेट सरदेसाई आणि आदित्य ठाकरेंवर कडाडत उत्तर दिले. आमची लायकी काढू नका. २०१९ ते २०२२ पर्यंत एकदाही या विषयावर बैठक घेतली गेली नाही.
सभागृहातील वातावरण अधिकच तापले तेव्हा गुलाबराव पाटील यांनीही वरुण सरदेसाईंवर निशाणा साधला. प्रश्न विचारायला ब्रिफींग घेऊन आला का? जन्मताच हुशार आहेस का? सरकारला लाज आहे का हे बोलायचे? असा प्रश्न त्यांनी विचारल्याने विरोधी बाकावरून गोंधळ सुरु झाला.
दरम्यान, या प्रकल्पातील रखडलेल्या कामांसाठी शंभुराजे देसाई यांनी सर्व आमदारांसोबत लवकरच बैठक घेण्याचे आश्वासन दिले. ते म्हणाले, ज्या मतदारसंघात हे प्रकल्प रखडले आहेत, त्या सर्व आमदारांसोबत बैठक घेतली जाईल. केन्द्रीय मंत्र्यांशीही चर्चा केली जाईल.
विधानसभेत आदित्य ठाकरे यांनीही मंत्री देसाई यांच्यावर टीका केली. मंत्री चुकीचं उत्तर देत आहेत, सभागृहाची दिशाभूल करत आहेत. मग हक्कभंग आणायचा का? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.
या वादात अतुल भातखळकर यांनी हस्तक्षेप करत सांगितले, या प्रश्नामुळे माझा मतदारसंघही बाधित आहे. धारावी पुनर्विकासासाठी रेल्वेची जागा घेतली, तर या प्रकल्पासाठी का नाही? नवीन कामांना परवानगी देण्यासाठी राज्य सरकार काय करणार?
वाद वाढतच राहिला. भास्कर जाधव यांनीही संताप व्यक्त करत म्हटले, मुख्यमंत्री उत्तर देत नाहीत. सभागृह चालवायचे की नाही? मला काही बोलण्याचा अधिकार आहे की नाही? यावर अध्यक्षांनी भास्कर जाधव यांना खाली बसण्याची विनंती केली, मात्र दोन्ही बाजूंनी घोषणाबाजी सुरु राहिल्याने अखेर सभागृह दहा मिनिटांसाठी तहकूब करण्यात आले.

## राहुल गांधींना हायकोर्टाचा दिलासा

### सावकरांवरील टिप्पणीबाबतची याचिका फेटाळली



■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १५ :
काँग्रेसचे नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्याविषयी केलेल्या कथित विधानांवरून दाखल करण्यात आलेली जनहित याचिका मुंबई उच्च न्यायालयाने मंगळवारी फेटाळून लावली.
याचिकेत राहुल गांधी यांना न्यायालयाने सावरकरांबद्दल अधिक माहिती मिळावी यासाठी याचिकेची प्रत वाचण्याचे निर्देश द्यावेत, अशी मागणी करण्यात आली होती. ही याचिका अभिनव भारत काँग्रेसचे संस्थापक अध्यक्ष डॉ. पंकज फडणीस यांनी दाखल केली होती. त्यांनी आपल्या याचिकेत नमूद केले होते की, राहुल गांधी यांच्या विधानांमुळे संविधानात दिलेल्या मूलभूत कर्तव्यांचे पालन करण्याच्या अधिकाराचे उल्लंघन झाले आहे.
सुनावणीदरम्यान न्यायालयाने एखाद्या नेत्याची विचारसरणी बदलण्यासाठी न्यायालय बंधनकारक आदेश देऊ शकत नाही, असे म्हणत याचिका फेटाळून लावत याचिकाकर्ते फडणीस यांना फटकारले.



## योजनांच्या अंमलबजावणीसाठी कामगारमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली

# समिती स्थापन करणार : मुख्यमंत्री

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १४ :


कामगारांच्या कल्याणासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांमध्ये पारदर्शकता यावी यासाठी कामगार मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात येईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत सांगितले. विधानसभा सदस्य संजय मेश्राम यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचना मांडली होती.



कामगार मंत्री आकाश फुंडकर म्हणाले, इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवा शर्ती) कायदा, १९९६ अंतर्गत महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ स्थापन केले असून, जुलै २०२० पासून आयडब्ल्यूबीएमएस प्रणालीच्या माध्यमातून नोंदणी, नूतनीकरण व लाभ वाटपाची प्रक्रिया पूर्णतः ऑनलाईन पद्धतीने राबविण्यात येत आहे. बांधकाम कामगारांना सुरक्षा संच, गृहपयोगी वस्तू संच आदी लाभ डीबीटी पद्धतीने थेट दिले जात असून, बायोमेट्रिक प्रमाणिकरणानंतरच वितरण केले जाते. यामुळे मानवी हस्तक्षेप शक्य नाही, आणि प्रक्रियेमध्ये पारदर्शकता राखली गेली आहे.

उमरेड विधानसभा क्षेत्रातील उमरेड, भिवापूर व कुही तालुक्यांमध्ये जानेवारी २०२५ ते जून २०२५ दरम्यान चार हजार कामगारांना सुरक्षा संच व नऊ हजार कामगारांना गृहपयोगी संच वाटप करण्यात आले आहे.

काही ठिकाणी खासगी दलालांकडून बोगस कागदपत्रांच्या आधारे कामगार नोंदणीचे प्रकार उघडकीस आले आहेत. याविरोधात दक्षता पथक राबवले असून नागपूर, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, नाशिक, पुणे, कोकण विभागात काही फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. विविध माध्यमातून आलेल्या तक्रारींवर चौकशी करून वेळोवेळी कठोर कारवाई करण्यात येत आहे. भविष्यातही अशा बोगस नोंदणीला आळा बसावा यासाठी कठोर आणि पारदर्शक पावले उचलली जातील, असेही मंत्री फुंडकर यांनी विधानसभेत सांगितले. विधानसभा सदस्य विजय वडेट्टीवार, प्रवीण दटके, जयंत पाटील यांनी या लक्षवेधी सूचनेत सहभाग घेतला.



# विधिमंडळ अधिवेशन

## गिरणा उपखोऱ्यातील पाण्याची तूट भरून काढण्यास शासन प्रयत्नशील : गिरीश महाजन



**मुंबई :** तापी खोऱ्यातील गिरणा उपखोरे हे सर्वाधिक पाण्याची तूट असणारे खोरे आहे. या उपखोऱ्यात ४० टीएमसी पाण्याची तूट आहे. ही तूट भरून काढण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे, असे जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री गिरीश महाजन यांनी आज विधानसभेत लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात सांगितले. धुळे जिल्ह्यातील सिंचनाबबत सदस्य राघवेंद्र पाटील यांनी लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती. या सूचनेच्या चर्चेत सदस्य अनिल पाटील यांनीही उपप्रश्न विचारत सहभाग घेतला. मंत्री महाजन म्हणाले, नार- पार - गिरणा नदीजोड प्रकल्प अतर्गत १०.४९ टीएमसी पाणी उपलब्ध होणार आहे. काही तांत्रिक कारणास्तव पार- तापी- नर्मदा हा आंतरराज्य प्रकल्प रद्द करण्यात झाला आहे. हा प्रकल्प रद्द झाला असला तरी उपलब्ध होणारे पाणी तापी गोदावरी खोऱ्यात वळविण्याच्या अनुषंगाने तांत्रिक आर्थिकदृष्ट्या तपासणी सुरू आहे. यामधून उपखोऱ्यात ९.६७ टीएमसी पाणी उपलब्ध करून देण्यासाठी नियोजन सुरू आहे. तांत्रिकदृष्ट्या तपासणी करून उपाययोजना करण्यात येत आहे. त्यामुळे धुळे जिल्ह्यातील सिंचनाचा प्रश्न सोडवण्यास मदत होणार आहे.

## पाणीटंचाई दूर करण्यासाठी कोकण वॉटर ग्रीडची मागणी

### आ. प्रविण दरेकर यांची मागणी



**मुंबई :** मराठवाड्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मराठवाडा वॉटर ग्रीडची संकल्पना मांडली, तशीच संकल्पना कोकणासाठी देखील राबवावी, अशी ठाम मागणी भाजपाचे गटनेते आमदार प्रविण दरेकर यांनी आज विधानसभेत केली. सभागृहात सत्ताधारी आणि विरोधकांच्या २६० अन्वये एकत्रित प्रस्तावावर बोलताना दरेकर म्हणाले की, वीज निर्मितीसाठी वापरले जाणारे ६७ टीएमसी पाणी वीज निर्मितीनंतर बोगद्यातून वशिष्ठ नदीला सोडले जाते आणि ते अरबी समुद्रात मिसळते. हे पाणी रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड जिल्ह्यात पाईपलाईनद्वारे वळवले तर कोकणातील पाणीटंचाई कायमची दूर होईल. कोकणाच्या समृद्धीसाठी ह्यकोकण वॉटर ग्रीडची तातडीने गरज असल्याचे त्यांनी सांगितले. शेतकऱ्यांच्या समस्यांकडे लक्ष वेधताना दरेकर म्हणाले, राज्यातील ८० ते ८५ टक्के शेतजमीन कोरडवाहू आहे.

## कुपोषणाच्या प्रमाणात लक्षणीय घट

### महाराष्ट्र देशातील पहिल्या पाच राज्यांमध्ये : आदिती तटकरे



**मुंबई :** राज्यातील बालकांमधील मध्यम व तीव्र कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी एकात्मिक बालविकास सेवा योजना व संबंधित विभागांनी संयुक्तरीत्या राबवलेल्या विविध उपाययोजनांमुळे मागील दोन वर्षांत कुपोषणाच्या प्रमाणात लक्षणीय घट झाली आहे महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी सांगितले. विधानपरिषदेतील सदस्य संजय केणेकर यांनी लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती. या चर्चेत सदस्य शशिकांत शिंदे, श्रीमती चित्रा वाघ, प्रविण दरेकर आणि संजय खोडके यांनी सहभाग घेतला. वर्ष २०२३ मध्ये राज्यात वजन व उंची घेतलेल्या एकूण ४१,६७,१८० पैकी मध्यम कुपोषित बालकांची संख्या २,१२,२०३ ज्याची टक्केवारी ५.०९ % होती. ती कमी होऊन २०२५ मध्ये राज्यात वजन व उंची घेतलेल्या एकूण ४८,५९,३४६ पैकी १,५१,६४३ इतकी टक्केवारी ३.१६ %झाली आहे. त्यामुळे २.७४% घट नोंदवली गेली आहे. तीव्र कुपोषित बालकांची संख्या २०२३ मध्ये वजन व उंची घेतलेल्या एकूण ४१,६७,१८० पैकी ८०,२४८ ज्याची टक्केवारी १.९३ % होती.

## रात्रशाळांसाठी नवे धोरण लवकरच : डॉ पंकज भोयर



**मुंबई:** राज्यातील रात्रशाळांमध्ये कार्यरत मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतन, नेमणूक व सेवा अटींमध्ये असलेल्या विसंगती दूर करण्यासाठी नवे धोरण तयार करण्यात येत आहे. यासाठी शिक्षण आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे, असे राज्यमंत्री डॉ पंकज भोयर यांनी विधानपरिषदेत सांगितले. सदस्य मनीषा कायंदे यांनी लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती. या चर्चेत सदस्य जगन्नाथ अभ्यंकर, विक्रम काळे आणि रणजित मोहिते- पाटील यांनी सहभाग घेतला. राज्यमंत्री डॉ. भोयर म्हणाले, शासनाचा उद्देश शिक्षण प्रवाहाबाहेर असलेल्या घटकांना रात्रशाळांमार्फत शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे असून विविध शिक्षक संघटना व लोकप्रतिनिधींनी यासंदर्भात मागण्या केल्या आहेत. या पार्श्वभूमीवर गठीत समितीचा अंतिम अहवाल प्राप्त झाल्यानंतर सुधारित धोरण लागू करण्यात येणार आहे.

## बोगस डॉक्टरांविरुद्ध कठोर कायदा तयार करण्याची प्रक्रिया सुरू : माधुरी मिसाळ



**मुंबई :** राज्यात बोगस डॉक्टरांविरुद्ध कठोर कारवाईचा बडगा उगारण्यात आला असून, सन २०२१ पासून आतापर्यंत सार्वजनिक आरोग्य विभागाने अहिल्यानगर, नाशिक, जळगाव आणि मुंबई या ठिकाणी अनुक्रमे ८, ४, ९ आणि ३४ अशा एकूण ५५ बोगस डॉक्टरांवर गुन्हे दाखल केले आहेत. बोगस डॉक्टरांविरुद्ध अधिक कठोर कायदा तयार करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी दिली. विधानपरिषदेत सदस्य सत्यजित तांबे यांनी लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती. राज्यमंत्री मिसाळ म्हणाल्या, राज्य सरकार आणि महाराष्ट्र वैद्यकीय परिषद यांच्यातील समन्वयातून (नो युवर डॉक्टर) ही आधुनिक क्यूआर कोड प्रणालीवर आधारित मोहीम सुरू करण्यात आली.

# राज्यातील कुष्ठरोग निर्मूलन मोहिमेला नवे बळ

## प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्यस्तरीय समिती स्थापन करण्याची घोषणा

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १४ :

महाराष्ट्रातील कुष्ठरोग निर्मूलन मोहिमेला गती देण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाने मोठा निर्णय घेतला आहे. राज्यातील कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी व्हावी यासाठी राज्यस्तरीय समिती स्थापन केली जाणार असल्याची घोषणा सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी विधानभवनात घेतलेल्या बैठकीत केली.

या समितीत कुष्ठरोग क्षेत्रातील तज्ज्ञ, डॉक्टर, स्वयंसेवी संस्था आणि या विषयावर काम करणाऱ्या व्यक्तींना सामाविष्ट केले जाणार आहे. दर तीन महिन्यांनी ही समिती आपला अहवाल राज्य सरकारला सादर करणार असून, तिच्या शिफारसींमुळे कार्यक्रमाची अंमलबजावणी अधिक परिणामकारक होईल, असा विश्वास आबिटकर यांनी व्यक्त केला.

कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रमाचे राज्यस्तरावर योग्य निरीक्षण करण्यासाठी आरोग्य सेवा आयुक्तांच्या नेतृत्वाखाली स्वतंत्र समितीही स्थापन करण्यात येणार आहे. ही समिती शहरी, ग्रामीण तसेच शालेय स्तरावरील रुग्ण शोध मोहीम, उपचार आणि पुनर्वसन यासाठी कार्यपद्धती ठरवेल व राज्यभरातील कामकाजाचे मार्गदर्शन करेल.

बैठकीत उपस्थित स्वयंसेवी संस्थांनी अनुदान वाढवण्याची मागणी मांडली. सध्या राज्यातील 12 स्वयंसेवी रुग्णालयांमध्ये 2,764 खाटा आहेत, तर 11 पुनर्वसन संस्थांमध्ये 1,825 खाटा मंजूर आहेत. रुग्णालयांना प्रति खाटा प्रतिमाह रु. 2,200 आणि पुनर्वसन संस्थांना रु. 2,000 इतके अनुदान मिळते. हे अनुदान वाढवून रु. 6,000 प्रति खाटा करण्याचा प्रस्ताव सार्वजनिक आरोग्य विभागाने तयार करून वित्त विभागाकडे सादर केला असून, लवकरच तो मंत्रिमंडळासमोर ठेवण्यात येणार असल्याचे आबिटकर यांनी सांगितले.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम म्हणून कुष्ठरोग निर्मूलनासाठी आरोग्य विभागाने शोध मोहीम, उपचार आणि निर्मूलन या त्रिसूत्रीवर लक्ष केंद्रीत करावे, तसेच आशा सेविका, शालेय आरोग्य तपासणी व इतर आरोग्य कर्मचाऱ्यांमार्फत जास्तीत जास्त रुग्णांपर्यंत पोहोचावे, असे निर्देशही त्यांनी दिले. या बैठकीस आमदार सुलभा खोडके, विदर्भ महारोगी सेवा मंडळ तपोवनचे प्रतिनिधी, आरोग्य सेवा आयुक्त डॉ. कादंबरी बलकवडे, आरोग्य संचालक डॉ. विजय कंदेवाड, कुष्ठरोग सहसंचालक डॉ. सांगळे तसेच विविध स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

## राज-उद्धव युतीबाबत सकारात्मक संकेत

### आमदार फोडण्याचा प्रयत्न : संजय राऊत

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १४ :



उबाठा-मनसे युतीच्या चर्चेवर मनसे प्रमुख राज ठाकरे यांचे वक्तव्य अतिशय योग्य आहे. त्यात काही चुकीचे नाही.अनौपचारिकपणे राज ठाकरे बोलले असे पत्रकार सांगत आहेत. औपचारिकपणे आम्ही लवकरच बोलू आम्ही आणि कार्यकर्ते आशावादी आहोत. राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र बसून निर्णय घेतील, असे ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांनी म्हटले आहे.

संजय राऊत पुढे बोलताना म्हणाले की, राज ठाकरे- उद्धव ठाकरे या दोघांची विधान युती बद्दल सकारात्मक आहेत. शिंदे गटातील लोकांचे मेळावे होतात. भ्रष्ट मंत्र्यांना घरी जावे लागणारच आहे. अधिकाऱ्यावर सामान्य माणसांवर कारवाई केली जाते पण भ्रष्ट मंत्र्यांवर कारवाई केली का जात नाही असा सवाल राऊतांनी उपस्थित केला आहे. नैतिकता उरली असेल तर पैशाच्या बँगा उघड्या ठेवणाऱ्या वर कठोर कारवाई आणि चौकशी लावली गेली पाहिजे. ज्यांनी गरीब कर्मचाऱ्यावर हल्ला केला त्यांच्यावर गुन्हा दाखल करावा. चालकाच्या नावावर दीडशे कोटीची संपत्ती असेल तर शिंदे भुमरेंना म्हणतील मला तुमच्याकडे चालक म्हणून घ्या, असा टोलाही त्यांनी लगावला आहे.

संजय राऊत म्हणाले की, नांदेडचे भाजप आमदार राजेश पवार यांची ऑडिओ क्लिप मला जितेंद्र आव्हाड यांनी पाठवली. ती मी तुम्हाला पाठवले, तिच्यातील संवाद हा ट्विट करण्यासारखा नाही. त्यामध्ये एका अधिकाऱ्याला उचलून आणत मारण्याची धमकी देण्यात आलेली आहे. कारणं काहीही असोत. मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना एक पत्र पाठवले आहे. नरेंद्र मोदींच्या सभेत एका कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी आंदोलन केले होते. कृष्णा डोंगरे यांनी भर सभेत कांद्याला भाव मिळावा म्हणून आंदोलन केले होते. त्या गोष्टीचा राग ठेवून नाशिकचे पोलिस अधिकारी आणि नेहमीच खोटे काम करणारे मंत्री यांनी एकत्र येत डोंगरे यांच्यावर अत्याचाराचा खोटा गुन्हा दाखल केला आहे. त्याला गावातून पळवून लावले. सरकारविरोधात आंदोलन केल्याच्या रागातून हे सर्व काही घडवले जात आहे. ज्या दिवशी हा गुन्हा दाखल करण्यात आला त्यादिवशी कृष्णा डोंगरे हे देवीच्या दर्शनासाठी वणीमध्ये होते हे सीसीटीव्ही फुटेज मध्ये दिसून येत आहे. संजय राऊत म्हणाले की, नाशिकच्या पोलिस आयुक्तांनी शिवसेनेचे कार्यकर्ते फोडण्यासाठी अशाच प्रकारे खोटे गुन्हे दाखल केले. भाजपची सुपारी घेऊन पोलिस आयुक्त काम करत आहे. अनेक जणांवर खोटे गुन्हे दाखल केले इणि ते भाजप प्रवेशासाठी तयार झाले आणि त्यांच्यावर कारवाई करण्यात आली नाही, असा आरोप राऊतांनी केला आहे.

## बेस्टच्या दुमजली बसगाडीला आग

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १४ :

बेस्ट उपक्रमाच्या बसगाड्यांच्या अपघाताची मालिका सुरूच असून मंगळवारी फोर्ट परिसरातून जात असलेल्या बसला अचानक आग लागली. या दुर्घटनेत सुदैवाने जीवितहानी झाली नाही. बेस्टची बस मार्ग क्रमांक ए-१३८ मंगळवारी सकाळी आगारातून बस निघाली. बस भाटिया बाग परिसरातून बॅकबे आगाराकडे जात होती. सिद्धार्थ महाविद्यालया नजिकच्या सिग्नल जवळ सकाळी ९.१५ च्या सुमारास बस पोहचली आणि अचानक बसला आग लागली.

## काँग्रेस-राष्ट्रवादीचे माजी नगरसेवक भाजपात

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १४ :

कोल्हापूरच्या राजकारणाला मोठा धक्का देत काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या माजी नगरसेवकांसह अनेक कार्यकर्त्यांनी भारतीय जनता पक्षात (भाजपा) आज जाहीर प्रवेश केला. भाजपाचे प्रदेशाध्यक्ष आणि मंत्री रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत झालेल्या पक्षप्रवेश कार्यक्रमामुळे येथील महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता आहे.

आज भाजपात प्रवेश करणाऱ्यांमध्ये काँग्रेसचे पाच वेळा निवडून आलेले ज्येष्ठ नगरसेवक दिलीप पोवार, सरस्वती पोवार, राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी नगरसेवक उत्तम कोराणे यांचा समावेश आहे. 'उबाठा' चे चंद्रपूर जिल्हाप्रमुख आणि जिल्हा सहकारी बँकेचे माजी अध्यक्ष रवींद्र शिंदे, सभापती वासुदेव ठाकरे, निफाड तालुक्यातील अनेक कार्यकर्ते तसेच मुंबईतील उबाठा गटाचे मंदार राऊत, संकेत रुद्र यांनीही भाजपात प्रवेश केला.

या पक्षप्रवेश सोहळ्यास उच्च तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, खासदार धनंजय महाडिक, आमदार अमल महाडिक, आमदार सुधीर गाडगीळ, प्रा. जयंत पाटील, मुरलीधर जाधव, भाजपा माध्यम प्रमुख नवनाथ बन यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी सर्वांचे स्वागत करताना सांगितले की, "पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून हे सर्व नेते आणि कार्यकर्ते भाजपात आले आहेत. त्यांच्या सामर्थ्यामुळे कोल्हापूरच्या विकास कामांना गती मिळेल." खासदार धनंजय महाडिक यांनी व्यक्त केला की, "दिलीप पोवार आणि उत्तम कोराणे यांच्या प्रवेशामुळे आगामी महापालिका निवडणुकीत भाजपाला मोठा फायदा होणार आहे."

## महाराष्ट्राला दुष्काळमुक्त करण्यासाठी जलसिंचन क्षमता वाढविली जाईल : राधाकृष्ण विखे-पाटील

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १४ :



महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त भागांमध्ये जलसिंचनाची क्षमता वाढवण्यासाठी शासन गंभीर असून, त्यासाठी महत्त्वाची पावले उचलण्यात येत आहेत, असे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे -पाटील यांनी विधान परिषदेत स्पष्ट केले.

सदस्य रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी अर्धा तास चर्चेत वाढत्या पाण्याची मागणी पूर्ण करण्याची सूचना केली होती, त्यावेळी मंत्री विखे - पाटील यांनी माहिती दिली. विखे-पाटील म्हणाले की, कृष्णा मराठवाडा प्रकल्पासाठी अंदाजे 21 टीएमसी पाणी उपलब्ध करून देण्याचे नियोजन आहे. यासाठी 115 टीएमसी पाण्याच्या फेरजल नियोजनाचा निर्णय घेण्यात आला आहे. यासोबतच, उजनी धरणातून 23.7 टीएमसी पाणी धाराशिव जिल्ह्यात वळवले जाणार आहे. या भागातील काही तालुक्यांमध्ये उपसा सिंचनाद्वारे पाणीपुरवठा केला जाईल. या प्रकल्पासाठी जागतिक बँकेच्या सहाय्याने महाराष्ट्र रेसिलियन्स डेव्हलपमेंट प्रोग्राम राबवण्यात येत आहे. फ्लड डायव्हर्जन ही यामधील मुख्य योजना असून, 13 मार्च 2024 रोजी त्याला मान्यता देण्यात आली आहे. दोन महिन्यांच्या कालावधीत पूराच्या पाण्याचा उपयुक्त वापर होईल, असे त्यांनी सांगितले.

प्रकल्पाचा सर्वेक्षण अहवाल लवकरच अपेक्षित असून, पुढील पावसाळ्यापूर्वी हे काम पूर्ण होण्याची अपेक्षा आहे. कृष्णा खोऱ्यातून भीमा खोऱ्यात सुमारे 55 टीएमसी पाणी आणण्याचा प्राथमिक अंदाज आहे. सर्व्हेक्षण झाल्यानंतर वस्तुस्थिती सादर करण्यात येईल,

## पायाभूत सुविधा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर राज्यातील वाहनांची गर्दी

### वाहतूक कोंडीवर मोठ्या प्रमाणात नियंत्रण : उदय सामंत

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १४ :



महाराष्ट्रातील सुरू प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर राज्यातील वाहनांची गर्दी, वाहतूक कोंडी यावर मोठ्या प्रमाणात नियंत्रण येईल, असे मंत्री डॉ.उदय सामंत यांनी आज विधान परिषदेत सांगितले.

सदस्य सत्यजित तांबे यांनी राज्यातील वाहतूक कोंडी, चुकीची चलने, पोलिसांची कारवाई आणि मोठ्या शहरांतील प्रकल्पांसंदर्भात अर्धा तास चर्चेच्या सूचना मांडल्या होत्या, त्यास मंत्री डॉ.सामंत यांनी उत्तर दिले.

मंत्री डॉ .सामंत म्हणाले की, वाहतूक कोंडी ही मुंबईसह सर्व मेट्रो शहरांमध्ये मोठी समस्या झाली आहे. यावर तोडगा काढण्यासाठी मागील महिन्यांत तीन बैठकांचे आयोजन करण्यात आले. यात एक बैठक उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. गृहविभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव इक्बाल चहल यांच्या नेतृत्वाखाली राज्यस्तरीय उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली असून, समितीने 20 दिवसांत गृह व परिवहन विभागाला अहवाल सादर करावा, अशा सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या असल्याचे त्यांनी सांगितले. गाडी पार्किंगमध्ये असतानाही चलन मिळतात, हे गंभीर प्रकार आहेत. त्यांचीही चौकशी सुरु आहे. कोणी आणि कुठे कॅमेरे लावले, याची माहिती घेतली जात आहे, असे मंत्री डॉ.सामंत यांनी सांगितले. वाहनांची वाढती संख्या देखील वाहतूक कोंडीस कारणीभूत ठरत असल्याचे मंत्री डॉ.सामंत यांनी नमूद केले. आजपर्यंत महाराष्ट्रात 4 कोटी 95 लाख वाहने नोंदवण्यात आली आहेत. फक्त मुंबईत दररोज 794 नव्या वाहनांची नोंद होते. यामुळेच मुंबई, पुणे, नागपूर यांसारख्या शहरांत मेट्रो जाळ्याचा विस्तार करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, असेही त्यांनी सांगितले. राज्यात मेट्रो प्रकल्पांची प्रगती सांगताना त्यांनी स्पष्ट केले की, मुंबईत 393.76 किमी, पुण्यात 136.42 किमी आणि नागपुरात 83.82 किमी लांबीचे मेट्रो प्रकल्प साकारले जात आहेत. मुंबईतील सागरी किनारा रस्ता हा ऐतिहासिक प्रकल्प असल्याचे सांगत सामंत म्हणाले की, पूर्वी वांद्र्याहून नरिमन पॉईंटला पोहोचायला दीड ते दोन तास लागायचे, आता तोच प्रवास 17-18 मिनिटांत होतो.

# गणपती बाप्पाच्या स्वागतासाठी एसटी सज्ज

## ५००० जादा बसेसची घोषणा : प्रताप सरनाईक

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १४ :

गणपती बाप्पाच्या आगमनासाठी कोकणातील चाकरमान्यांचा उत्साह शिगेला पोहोचला असताना, त्यांच्या प्रवासाची सोय करण्यासाठी एसटी महामंडळ सज्ज झाले आहे. यंदा २३ ऑगस्ट ते ७ सप्टेंबर २०२५ दरम्यान अधिकच्या जादा बसेस धावणार असल्याची मोठी घोषणा परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी केली आहे.

मंत्रालयातील दालनात गणपती उत्सवाच्या जादा वाहतूकीच्या पार्श्वभूमीवर आयोजित बैठकीत ते बोलत होते. या बैठकीला महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर तसेच एसटीचे सर्व खातेप्रमुख उपस्थित होते.



प्रताप सरनाईक म्हणाले, गणपती उत्सव म्हणजे कोकणच्या चाकरमान्यांचा जीव की प्राण आहे. गणपती बाप्पा, कोकणचा चाकरमानी आणि एसटी यांचे अतुट नाते आहे. त्यामुळे नफा-तोटा न पाहता, कोकणातील रस्त्यांवर यंदाही तब्बल ५००० जादा बसेस सोडण्यात येणार आहेत. या सर्व बसेसचे आरक्षण या अधिकृत संकेतस्थळावर तसेच MSRTC Bus Reservation ॲपवर करता येणार आहे. बसस्थानकांवरही आरक्षणाची सुविधा उपलब्ध असेल.

याआधी आषाढी एकादशीच्या यात्रेसाठी ५२०० जादा बसेस सोडण्यात आल्या होत्या आणि त्या उपक्रमाला प्रवाश्यांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला होता. त्यामुळेच यंदाच्या गणेशोत्सवासाठीही महामंडळाने ही व्यापक योजना आखली आहे.

एसटीने जादा बसेससाठी २२ जुलैपासून गट आरक्षणाला सुरुवात करण्याचा निर्णय घेतला आहे. यामध्ये अमृत ज्येष्ठ नागरिकांना १००% सवलत, तसेच सामान्य ज्येष्ठ नागरिक व महिलांना ५०% तिकीट सवलत दिली जाणार आहे.

मुंबई, ठाणे, पालघर या विभागांतील प्रमुख बसस्थानकातून २३ ऑगस्टपासून या जादा बसेस कोकणासाठी धावणार आहेत. गतवर्षी ४३०० बसेस सोडण्यात आल्या होत्या.

गणेशोत्सवादरम्यान एसटीची वाहतूक सुरळीत राहावी यासाठी, प्रत्येक बसस्थानकावर वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी अहोरात्र कार्यरत राहणार आहेत. तसेच कोकणातील महामार्गांवर वाहनदुरुस्ती पथके तैनात करण्यात येणार असल्याचेही परिवहन मंत्री सरनाईक यांनी स्पष्ट केले.

## मुंबई, पुणे आणि नाशिकला हवामान विभागाचा यलो अलर्ट

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १४ :

महाराष्ट्रात पावसाने पुन्हा एकदा जोर धरला असून, हवामान विभागाने राज्यातील अनेक भागांत मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. रायगड जिल्ह्यात काही तासांत जोरदार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे, तर सिंधुदुर्ग जिल्ह्यातील अनेक भागांत पूरसदृश स्थिती निर्माण झाली आहे. नद्या-ओढे दुथडी भरून वाहत असून काही सखल भागात पाणी साचले आहे. यामुळे स्थानिक प्रशासन सतर्क झाले असून, जिल्हा प्रशासनाकडून नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

कोकण आणि घाटमाथ्याच्या परिसरात दक्षिण-पश्चिम मान्सून पूर्ण ताकदीने सक्रीय झाल्यामुळे रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, ठाणे, पालघर, मुंबई, पुणे आणि नाशिक या जिल्ह्यांसाठी हवामान विभागाने यलो आणि ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. रायगडमध्ये आज संध्याकाळनंतर आणि रात्रीच्या सुमारास वादळी वाऱ्यासह जोरदार सरी कोसळण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कुडाळ, मालवण, सावंतवाडी, दोडामार्ग या भागांत जोरदार पावसाने कहर केला असून, काही भागांत घरांत पाणी शिरले असून, रस्ते पाण्याखाली गेले आहेत. स्थानिक आपत्ती व्यवस्थापन यंत्रणांना अलर्टवर ठेवण्यात आले असून, एनडीआरएफचे पथक सज्ज करण्यात आले आहे. शाळा आणि महाविद्यालयांना आवश्यकतेनुसार तात्पुरत्या सुट्ट्या जाहीर करण्याचे अधिकार स्थानिक प्रशासनाकडे दिले आहेत.

महासागर
बुधवार दि. 16 जूलै 2025
अमरावती
पान 3



**पोलिसांना दिसत नाही का?**

**अमरावती**-येथील रुक्मिणी नगर मार्गावर असलेल्या बजाज चेतक शोरूम समोरील हे भयावह दृश्य आहे,यामध्ये शोरूम मध्ये येणाऱ्या वाहनांनी जो रस्ता अत्यंत वर्दळीचा असतो तो अर्ध्याहून अधिक गिळंकृत केला आहे. पार्किंग मध्ये एक चाक पांढऱ्या पट्ट्याच्या बाहेर असलेली दुचाकी उचलून नेणाऱ्या पोलिसांना हे दिसत नाही का ?असा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांना पडला आहे. **( छायाचित्र मनीष जगताप )**

# अमरावती कृषी उत्पन्न बाजार समितीचे कार्यकारणी मंडळ लवकरच बरखास्त होणार?



## सचिव दीपक विजयकर यांना हटविण्याचे आदेश





**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि. 15 ) -** अमरावती कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये झालेल्या गैरव्यवहार आणि भ्रष्टाचार प्रकरणी कार्यकारणी मंडळ लवकरच बरखास्त होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. राज्य विधिमंडळाच्या चालू अधिवेशनात आमदार संजय खोडके यांच्या लक्षवेधी सूचनेनंतर पणन विभाग ॲक्शन मोडमध्ये आला आहे. पणन मंत्री जयकुमार रावल यांनी सभागृहात उत्तर देताना, भ्रष्टाचाराचे आरोप असलेले कृ.उ.बा.सचिव दिपक विजयकर यांचा तत्काळ कार्यभार काढून घेण्याचे आदेश दिले आहे, इतकेच नव्हे तर त्यांची चौकशीही होणार असल्याची माहिती आहे. तसेच संचालक मंडळावरही कारवाईचा इशारा दिला आहे.

आ. संजय खोडके यांनी सभागृहात माहिती देताना सांगितले की, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती यांच्याकडून 44 लाख रुपयांची कामे व विद्युत प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. मात्र, या कामांसाठी शासनाच्या खरेदी प्रक्रियेचे पालन न करता नियमबाह्य पद्धतीने निविदा न देता कामे देण्यात आली. तसेच एका कामाचे अनेक बनावट प्राकलने तयार करण्यात आल्याचेही उघड झाले आहे. या प्रकरणात संबंधित सचिवावर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पूर्वीच कार्यवाही केली होती. मात्र, आश्चर्य म्हणजे विद्यमान संचालक मंडळाने त्यांना पुन्हा सचिवपदी नियुक्त केले. ही बाब प्रशासकीय अप्रामाणिकतेचा कळस मानली जात आहे. चौकशी समितीने आपल्या अहवालात संचालक मंडळालाही दोषी ठरवले असून, संबंधित अपहाराची वसुली व फौजदारी कारवाईसाठी शिफारस केली आहे.

याबाबत आ. खोडके यांनी सरकारकडे सचिवाचा कार्यभार तात्काळ काढून घेऊन असिस्टंट रजिस्ट्रार यांच्याकडे कार्यभार सोपवण्याची मागणी केली. तसेच चौकशी अहवालानंतरही अद्याप कारवाई का झाली नाही, असा सवाल उपस्थित केला. यासंदर्भात पणन संचालक, पुणे यांनी सचिवांविरोधात दाखल अपील फेटाळून चौकशी समितीच्या अहवालानुसार जिल्हा उपनिबंधकांना पुढील कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत. या घोषणेमुळे अमरावतीतील राजकीय व प्रशासकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. अनेक वर्षांपासून सत्तेवर असलेले मंडळ आता कारवाईच्या कड्यावर असल्याचे चित्र दिसते. कृषी उत्पन्न बाजार समित्या ही शेतकऱ्यांच्या हितासाठी कार्य करणारी संस्था असून, अशा संस्थेमध्ये भ्रष्टाचार होणे अत्यंत निंदनीय आहे. आता चौकशी, कारवाई आणि दोषींवर कठोर शिक्षा होणे हीच काळाची गरज आहे.

### भ्रष्टाचार झाल्याचा अहवाल

गेल्या काही महिन्यांपासून अमरावती कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये विविध आर्थिक अनियमितता, खोट्या प्राकलनांची निर्मिती, ई-निविदा प्रक्रियेचा अभाव, तसेच शासकीय निधीचा गैरवापर झाल्याच्या तक्रारी समोर येत होत्या. विशेषत: विद्युत कामांमध्ये प्रचंड भ्रष्टाचार, तसेच साफसफाईच्या ठेक्यात अनियमितता झाल्याचे चौकशी अहवालात नमूद करण्यात आले आहे.

### काय म्हणाले पणन मंत्री

या पार्श्वभूमीवर सभागृहात उत्तर देताना पणन मंत्री जयकुमार रावल यांनी स्पष्ट केले की, 'अमरावती कृषी उत्पन्न बाजार समितीमधील सचिवाचा कार्यभार आजच काढण्यात येईल. सचिवाची खुली चौकशी करण्यात येणार आहे. तसेच संचालक मंडळालाही कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली असून, यापैकी एक संचालकाने उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. न्यायालयाच्या आदेशानंतर, एका महिन्यात कार्यकारणी मंडळ बरखास्त करण्याबाबतची कारवाई करण्यात येईल.'



# 12 तासांत अपहरण, लूट प्रकरणातील आरोपी अटकेत

## 2.72 लाखांचा मुद्देमाल जप्त, फ्रेजरपुरा पोलिसांची कारवाई

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.15 )-** फ्रेजरपुरा पोलिसांनी अपहरण व लूटप्रकरणी जलद कारवाई करत केवळ 12 तासांत दोन आरोपींना अटक केली असून, एका अल्पवयीन मुलाला ताब्यात घेतले आहे. आरोपींकडून 2 लाख 72 हजार 200 रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

चिखलदरा येथील अरुण भंगी परते (20) हा अमरावतीतील सुंदरलाल चौकात वेटर म्हणून काम करत होता. 11 जुलैच्या रात्री, चार युवकांनी त्याचे अपहरण करून चाकूच्या धाकाने मोबाईल व पैसे लुटले. त्यांनी त्याच्याकडून आधी 5 हजार रुपये, नंतर 15 हजार रुपयांची मागणी केली. पोलिसांत तक्रार दिल्यास मोबाईल फोडण्याची धमकीही दिली.

फ्रेजरपुरा पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज व गुप्त माहितीच्या आधारे श्रीकृष्ण ऊर्फ क्रिश प्रमोद सुयंवशी (20) व अनीश ऊर्फ अंशु वाघमारे (20, रा. लक्ष्मीनगर) यांना अटक केली. तिसरा अल्पवयीन आरोपीही ताब्यात आहे.ही कारवाई पोलीस निरीक्षक रोशन सिरसाट यांच्या मार्गदर्शनाखाली राहुल महाजन, सुभाष पाटील आदी पथकाने केली.

# रिजवान मुलानी खून प्रकरणात एक अटकेत, दोन फरार



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.15 )-** फ्रेजरपुरा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील एसआरपीएफ कॅम्पजवळ टेकडीवर पुण्याच्या रिजवान मुलानी या तरुणाची निर्घृण हत्या करण्यात आली होती. तब्बल 12 दिवसांनंतर ही घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी गुन्हे शाखा युनिट 1 च्या पथकाने प्रतिक संजय नाईक (19) या आरोपीला तपोवन परिसरातून अटक केली आहे.

या हत्येचा छडा एका अल्पवयीन मुलाच्या मोबाईलमधील फोटो मुळे लागला. गाडगेनगर डीबी पथकाने या मुलाला संशयास्पद हालचाली करताना पकडून विचारपूस केली असता, त्याने तिघांनी मिळून रिजवानच्या डोक्यावर लोखंडी रॉडने वार करून हत्या केल्याची कबुली दिली. मृतदेह टेकडीवरील गटार चेंबरमध्ये फेकून देण्यात आला होता. फ्रेजरपुरा पोलिसांनी घटनास्थळी जाऊन मृतदेह ताब्यात घेतला. दरम्यान, गुन्हे शाखेच्या पथकाने प्रतिक नाईकला अटक केली असून, इतर दोन आरोपी अजूनही फरार आहेत. पोलीस त्यांचा शोध घेत आहेत.



# बनावट रॉयल स्टॅग दारुची विक्री

## मध्यप्रदेशात आणला जात होता माल

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती ( दि.15 )-** रॉयल स्टॅग ब्रँडच्या रिकाम्या बाटल्यांत मध्यप्रदेशातून आणलेली निकृष्ट दर्जाची दारू भरून विक्रीसाठी ठेवण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार अमरावतीत उघडकीस आला आहे. गुन्हे शाखा युनिट-2 ने वसंत टॉकीजजवळील गोदामावर छापा टाकून दोन आरोपींना अटक केली असून, 3.14 लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

गुप्त माहितीच्या आधारे गुन्हे शाखा युनिट-2 ने वसंत टॉकीज परिसरातील एका गोदामावर छापा टाकून विक्की मातोले (38, रा. संतोषी नगर) याला अटक केली. त्याच्याकडून 515 नकली दारूच्या बाटल्या (मूल्य 97,850 रु.), 513 सील, 74 रिकाम्या बाटल्या आणि एक स्विफ्ट डिझायर कार असा एकूण 3,14,425 रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

ही कारवाई पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक महेश इंगोले आणि त्यांच्या पथकाने केली. नकली दारू विक्रीमुळे नागरिकांच्या आरोग्याला गंभीर धोका निर्माण झाला असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

**सूचना**

## कलाम ट्रान्समिशन लिमिटेड

(युनिट नं.101, पहिला मजला, विंडसर, गाव कोळे कल्याण, ऑफ सीएसटी रोड, विद्यानगरी मार्ग, सांताक्रूझ (पू.), मुंबई, महाराष्ट्र - 400098)

1. वरील याचिकाकर्त्याने केंद्रीय विद्युत् नियामक आयोग, नवी दिल्ली यांच्याकडे *कलाम पीएसकरिता आरई इंटरकनेक्शनसाठी 220 केव्ही बेज् सह, 2X500 एमव्हीए, 400/220 केव्ही आयसीटी (तिसऱ्या आणि चौथ्या) द्वारे "परिवर्तन क्षमता संवर्धन / ट्रांसफर्मेशन क्षमतेमध्ये वाढ"* साठी टेरिफ निश्चितीकरिता याचिका दाखल केली आहे.
2. जनरेटिंग स्टेशन/ट्रान्समिशन सिस्टिमचे लाभार्थी पुढीलप्रमाणे:
   - (a) सेंट्रल ट्रान्समिशन युटिलिटी (सीटीयू)
   - (b) रीन्यू सोलर सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड
   - (c) आरईसी पॉवर डेव्हलपमेंट अँड कन्सलटन्सी लिमिटेड
   - (d) वेस्टर्न ट्रान्सको पॉवर लिमिटेड
   - (e) आरईसी पॉवर डेव्हलपमेंट अँड कन्सलटन्सी लिमिटेड (आरईसीपीडीसीएल)
   - (f) वेस्टर्न ट्रान्सको पॉवर लिमिटेड
   - (g) जेएसडब्लू रीन्यू एनर्जी लिमिटेड
   - (h) सेरेंटिका रीन्यूएबल्स इंडिया 4 प्रायव्हेट लिमिटेड
   - (i) वेह ग्लोबल इंडिया प्रायव्हेट लिमिटेड
   - (j) टोरेंट सोलरजेन लिमिटेड
   - (k) छत्तीसगड स्टेट पावर डिस्ट्रिब्यूशन कंपनी लिमिटेड
   - (l) गोवा विद्युत् विभाग
   - (m) पॉवर ग्रिड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड
   - (n) मध्य प्रदेश पॉवर मॅनेजमेंट कं.लि.
   - (o) महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी डिस्ट्रिब्यूशन कंपनी लिमिटेड
   - (p) एसीबी (इंडिया) लिमिटेड
   - (q) टोरेंट पॉवर लिमिटेड
   - (r) वेस्ट बंगाल स्टेट इलेक्ट्रिसिटी डिस्ट्रिब्यूशन कंपनी लिमिटेड
   - (s) जीएमआर वरोरा एनर्जी लिमिटेड
   - (t) थर्मल पॉवरटेक कॉर्पोरेशन इंडिया लिमिटेड
   - (u) छत्तीसगड स्टेट पॉवर ट्रेडिंग कंपनी लिमिटेड
   - (v) डीबी पॉवर लिमिटेड
   - (w) इंडियन रेल्वेज
   - (x) ईस्ट सेंट्रल रेल्वे
   - (y) वेस्ट सेंट्रल रेल्वे
   - (z) वेस्टर्न रेल्वे
   - (aa) अदानी पॉवर (मुंद्रा) लिमिटेड
   - (bb) टीआरएन एनर्जी प्रायव्हेट लिमिटेड
   - (cc) आर्सेलॉरमित्तल निप्पॉन स्टील इंडिया लिमिटेड
   - (dd) सेंट्रल रेल्वे
   - (ee) दादरा आणि नगर हवेली आणि दमण आणि दीव पॉवर डिस्ट्रिब्यूशन कॉर्पोरेशन लिमिटेड
   - (ff) एमपीएसईझेड यूटिलिटीज् लिमिटेड
   - (gg) व्हीईएच आरूष रीन्यूएबल्स प्रायव्हेट लिमिटेड
3. उत्पादन स्टेशनची क्षमता/लाईनची लांबी, वितरण व्यवस्थेसाठी बेज्ची (कक्षांची) संख्या:

| वितरण योजनेची व्याप्ती | क्षमता/किमी |
|---|---|
| *कलाम पीएसकरिता आरई इंटरकनेक्शनसाठी 220 केव्ही बेज् सह, 2X500 एमव्हीए, 400/220 केव्ही आयसीटी (तिसऱ्या आणि चौथ्या) द्वारे परिवर्तन क्षमता संवर्धन/ ट्रांसफर्मेशन क्षमतेमध्ये वाढ* | • *कलाम पूलिंग स्टेशनची 2X500 एमवीएने वाढ: संख्या 2*<br>o *500 एमवीए, 400/220 केव्ही आयसीटी: संख्या 2*<br>o *400 केव्ही आयसीटी बेज्: संख्या 2*<br>o *400/220 केव्ही आयसीटीज् 220 केव्ही आयसीटी बेज्: संख्या 2*<br>• *आरई इंटरकनेक्शनसाठी 220 केव्ही लाईन बेज्: संख्या 2*<br>o *220 केव्ही लाईन बेज्: संख्या 2*<br>• *कलाम पीएसमध्ये 1X125 एमवीएआर बस रिॲक्टर (दुसरा)*<br>o *125 एमवीएआर 420 केव्ही बस रिॲक्टर-संख्या 1*<br>o *बस रिॲक्टर बे: संख्या1* |

4. परियोजनेचे मान्य भांडवल (लाख रू.):

| मूळ | सुधारित अंतिम |
|---|---|
| रू. 15,689.00 लाख (सीटीयूआयएलद्वारे त्यांचे कार्यालयीन ज्ञापन, दिनांक 15.11.2022 अन्वये अनुमोदित) | रू. 19,825.42 लाख (ईपीसी ठेकेदारांकडून प्राप्त बोलींच्या आधारे, याचिकाकर्त्याच्या बोर्डाकडून अनुमोदित) |

5. यावसायिक कार्यारंभाचा निर्धारित दिनांक: **31.12.2024**
6. व्यावसायिक कार्यारंभाचा प्रत्यक्ष दिनांक: **04.01.2025**
7. व्यावसायिक कार्यारंभाच्या दिनांकाला पूर्ण भांडवली गुंतवणूक (रू. लाख): **रू.19,296.14 लाख**
8. टॅरिफचा तपशील:

| | मागील वर्षाचे टेरिफ | वर्षवार टेरिफ निश्चितीची मागणी | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | पहिले वर्ष | दुसरे वर्ष | तिसरे वर्ष | चौथे वर्ष | पाचवे वर्ष |
| ट्रान्समिशन सिस्टिमद्वारे ट्रान्समिशन शुल्क | लागू नाही | रू. 862.31 लाख | रू. 4,014.89 लाख | रू. 4,211.87 लाख | रू. 4,138.03 लाख | रू. 4,067.57 लाख |


9. टेरिफ निश्चित करण्यासाठी दाखल केलेल्या याचिकेची प्रत वेबसाईटवर पोस्ट केलेली आहे आणि पुढील लिंकवर पाहता येईल: https://www.indigrid.co.in/documents-manager/.
10. याचिकेमध्ये उल्लेख केलेल्या टेरिफ निश्चिती प्रस्तावावर असल्यास, सूचना किंवा हरकती, लाभार्थींसह अन्य कोणत्याही व्यक्तीद्वारे याचिकाकर्त्याला एक प्रत पाठवून, आयोगाच्या ई-फायलिंग पोर्टलच्या माध्यमातून दाखल केल्या जाऊ शकतील.

**स्थळ: मुंबई**
**दिनांक: 16 जुलै, 2025**

**स्वाक्षरी/-**
**(कंपनी सेक्रेटरी)**

# तीन दिवसांत चिखलदरा नगरपालिकेला मिळाला 7.14 लाखांचा पर्यटन कर

## 7500 हून अधिक वाहने दाखल; पर्यटकांची विक्रमी गर्दी



**महासागर प्रतिनिधी**

**चुरणी ( दि.15 )-** विदर्भाचे नंदनवन म्हणून ओळखले जाणारे चिखलदरा पुन्हा एकदा पर्यटकांच्या आकर्षणाचे केंद्र बनले आहे. मागील शुक्रवार, शनिवार आणि रविवार या सलग तीन दिवसांत चिखलदऱ्यात तब्बल 7,500 वाहने दाखल झाली. या अभूतपूर्व गर्दीमुळे चिखलदरा नगरपालिकेला एकूण 7 लाख 14 हजार 920 रुपयांचा पर्यटन कर वसूल झाला आहे.

ही आतापर्यंतची सर्वाधिक करवसुली ठरली असून, चिखलदरा नगरपालिकेच्या नोंदीनुसार हे महसूल उत्पन्न एक ऐतिहासिक कामगिरी मानली जात आहे. नगरपालिकेचे नाका प्रमुख कुमार सावंत यांनी याबाबत माहिती देताना सांगितले की, 'प्रथमच इतक्या मोठ्या प्रमाणात कर वसूल झाला असून, या गर्दीमुळे स्थानिक प्रशासन आणि व्यावसायिक दोघेही उत्साही झाले आहेत.'

### व्यावसायिकांत आनंदाचे वातावरण

पर्यटकांच्या मोठ्या लोंढ्यामुळे स्थानिक व्यवसायांना देखील चालना मिळाली आहे. हॉटेल व्यवसायिक, खाद्यपदार्थ विक्रेते, भटकंती सेवा देणारे, दुकानदार आदींना तीन दिवसांत भरघोस उत्पन्न झाले आहे. यामुळे छोट्या व्यावसायिकांपासून मोठ्या उद्योजकांपर्यंत सर्वांच्याच चेहऱ्यावर समाधान झळकत आहे. व्यावसायिक मोहम्मद सलीम म्हणाले, 'मी गेली 50 वर्षे चिखलदरात व्यवसाय करतो, पण अशी गर्दी मी कधीच पाहिलेली नाही. पर्यटनामुळे इथल्या नागरिकांना आर्थिकदृष्ट्या मोठा आधार मिळतो आहे.'

### पर्यटनाच्या नव्या शक्यता

पावसाळी हंगामामुळे चिखलदराचे सौंदर्य खुलले असून, येथील धबधबे, जंगल सफारी, थंडीचे हवामान आणि निसर्गरम्य वातावरण हे पर्यटकांना भुरळ घालणारे ठरत आहेत. ही गर्दी पाहता भविष्यात पर्यटन क्षेत्राला आणखी बळकटी मिळावी यासाठी प्रशासनाने पायाभूत सुविधा वाढवण्याची गरज असल्याचेही जाणकार सांगतात.एकूणच, या गर्दीमुळे चिखलदऱ्याच्या पर्यटन विकासास चालना मिळणार असून, स्थानिक अर्थव्यवस्थेवर याचा सकारात्मक परिणाम होणार आहे.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४





# विचारांवर हल्ला म्हणजेच लोकशाहीवर हल्ला!

महाराष्ट्रातील सामाजिक क्रांतीची ज्योत अखंड प्रज्वलित ठेवणारे, हजारो युवकांच्या आयुष्याला दिशा देणारे, बहुजन समाजातून उद्योजकतेचे स्वप्न सत्यात उतरवणारे प्रविण गायकवाड यांच्यावर अक्कलकोट येथे करण्यात आलेला शाईफेक हल्ला म्हणजे केवळ एका व्यक्तीवर नव्हे, तर शिव-फुले-शाहू-आंबेडकर यांच्या विचारसरणीवर घातलेला भ्याड आघात समजायला हरकत नाही. अहद कॅनडा ते तहद ऑस्ट्रेलिया या अभियानातून त्यांनी जे कार्य उभं केलं, ते नुसतं कार्य नव्हतं ते क्रांतीचं वादळ होतं. या वादळात हजारो तरुणांना शिक्षण, उद्योजकता, आत्मभान आणि सामाजिक सन्मान लाभले. ज्यांनी प्रविण गायकवाड यांच्यावर हल्ला केला, ते खरे शिवप्रेमी नसून कुणीतरी पोसलेले गावगुंड, कुणाचे तरी हस्तक व दलाल दिसतात. आता सरकारकडे नजर टाकली तर लक्षात येते की, मुस्लिमांना टार्गेट करायला नितेश राणेला उभं केलं. खिस्तींना टार्गेट करायला पडळकर उभा केला. डाव्या संघटनाना टार्गेट करायला जन सुरक्षा कायदा आणला. समाजवादी पुरोगामी टार्गेट करायला सनातनी उभे केले. मराठी लोकांना टार्गेट करायला गुजराती धंद्यावाले व युपीचे भैय्ये उभे केले. बुद्धाला टार्गेट करत संन्यस्त खड्ग नावाचं दर्जाहीन दर्जाचे नाटक सुरू केले. आता तर संभाजी ब्रिगेडच्या प्रविण गायकवाड यांच्यावरही हल्ला झाला. या सर्व प्रक्रियेतून महाराष्ट्र उभा राहणार नाही, तर तो रसातळाला जाण्याची प्रक्रिया सुरू होईल. ती रोखण्याची गरज आहे. सत्ताधारी कोणत्याही धर्माचे किंवा विचाराचे समर्थक असले तरी विरोधक भारतीय आहे, याचे भान ते विसरले आहे. यातून विध्वंस निर्माण होईल व तो आटोक्यात आणणे कठीण जाईल. गायकवाड यांच्यावरील हल्ल्याचं मूळ शोधणं आणि त्याच्या मुळावर घाव घालणं गरजेचं आहे. हा हल्ला मतभेद नव्हता, हा एक पूर्वनियोजित कट होता, त्यांचा आवाज बंद करण्यासाठी. प्रविण गायकवाडांचे गुन्हे काय आहेत तर? त्यांनी युवकांना उद्योगाचे धडे दिले, त्यांनी इतिहासाचा खरा चेहरा दाखवला, त्यांनी सत्ताधाऱ्यांचे मुखवटे फाडले, त्यांनी बहुजन समाजाला आत्मभान दिले. या देशात कोरटकर, छिंदम, कोश्यारी अशा लोकांनी खुलेआम छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान केला तरी त्यांच्यावर कारवाई झाली नाही. मात्र सामाजिक कार्यकर्ते, पुरोगामी विचारवंत जर प्रश्न विचारू लागले तर त्यांच्यावर गुन्हे दाखल केले जातात, त्यांच्यावर हल्ले होतात. ही लोकशाहीची विटंबना नाही का? हे हल्लेखोर शिवभक्त नाहीत तर विचारभ्रष्ट गुंड आहेत. त्यांना शिवाजी महाराजांचा विचार समजत नाही व मानवत नाही. कारण शिवाजी महाराज हे दलित, बहुजन, शेतकरी, शूर वीरांचे राजे होते, मूठभर सत्ताधीशांचे नव्हे. सरकार जनसुरक्षा कायद्याचा वापर विचारवंतांना गप्प बसवण्यासाठी करते आणि दुसरीकडे विचार मांडणाऱ्यांवर हल्ले होत असताना मौन बाळगते. हे सरकार गुन्हेगारांना अप्रत्यक्ष संरक्षण देत आहे असे स्पष्टच दिसते!

भाजपा युवा मोर्चाच्या दीपक काटे याने हा हल्ला केला आहे. काही दिवसापूर्वीच या काटेला पुणे विमानतळावरती पिस्तुलासहित अटक केली होती. परंतु वरदहस्त असल्यामुळेच त्यातून तो बाहेर पडला. आता त्या चौकशीचे काय झालं? पिस्तूल कुठे याचे उत्तर गृहमंत्री देणार का?

आता मराठा समाज याच जाहीर निषेध करणार नाही, तर या काटेचा करेक्ट कार्यक्रम करणार असे संभाजी ब्रिगेड पुणेचे प्रशांत धुमाळ यांनी जाहीर केले. याचाच अर्थ हेच कुणाला तरी अपेक्षित होते, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. गायकवाडांच्या मते आपल्यावरील हल्ल्याच्या घटनेला पूर्णपणे सरकार जबाबदार आहे, आपल्या हत्येचा कट होता आणि ही शेवटाची सुरुवात आहे.

गायकवाड अक्कलकोटला गेले होते. अचानकपणे शिवधर्म प्रतिष्ठान फौंडेशनच्या कार्यकर्त्यांनी त्यांच्यावर काळं वंगन तेल टाकलं. डॉ. गोविंद पानसरे यांचा खून झाला. डॉ. कलबुर्गी, डॉ. नरेंद्र दाभोळकर यांचा खून झाला. डॉ. गौरी लंकेशचा खून झाला. आता त्याच विचारधारेच्या गायकवाड यांच्यावर हल्ला झाल्यामुळे महाराष्ट्र अस्वस्थ झाला आहे.

कधीकधी पक्ष फोडले जातात, पक्षांतर मग कार्यकर्ते फोडण्याचा प्रयत्न केला जातो. मग त्यांच्या मनासारखी कुठली गोष्ट करता आली नाही, तर हल्ले केले जातात. या देशात मानवता प्रस्थापित झाली पाहिजे, यासाठी संभाजी ब्रिगेडचं काम चालू आहे. पण दुर्दैवाने अशा सामाजिक संघटनांबाबत काही गैरसमज पसरवले जातात.

या हल्ल्यामुळे असे वाटते की, जाणीवपूर्वक पोलीस यंत्रणा तिथे नव्हती का? काही ठरवून षडयंत्र घडलं होतं का? गायकवाडांच्या जीविताला धोका होता का? संभाजी ब्रिगेड संघटनेचे नाव बदलून धर्मवीर संभाजी ब्रिगेड करा, अन्यथा घरात घुसून मारू अशी खुलेआम धमकी मागच्या काही महिन्यांपासून काही गुंडाकडून दिली जात होती.

गेली ४० वर्षे सामाजिक क्षेत्रात तरुणांना दिशा देण्याचे काम करणारे गायकवाड यांच्यावरील भ्याड हल्ल्याची ही घटना शासन, प्रशासन आणि पोलिस खात्याचे धिंडवडे काढणारी आहे. ही सरकारी यंत्रणेची सपशेल हार आहे.

नुकताच राज्य सरकारने राज्यात जनसुरक्षा कायदा मंजूर करून डाव्या विचारांच्या संघटनांवर कारवाईचे संकेत दिले आहेत, त्या पार्श्वभूमीवर उजव्या विचारांच्या संघटनांची ही दादागिरी सरकार पुरस्कृत आहे का ? दिपक काटे, संभाजी भिडे यांना हा कायदा लागू होणार का ? संबंधितांवर कारवाई न करता त्यांना असे हल्ले करण्याची मुभा दिली जाणार आहे का? सरकारला हेच भ्याड हल्ले अपेक्षित आहेत का? हा सरकार पुरस्कृत दहशतवादी हल्ला आहे का?

संभाजी ब्रिगेड संघटना २८ वर्षांपासून कार्यरत आहे. संघटनेच्या नावातून कोणत्याही प्रकारे एकेरी उल्लेख होत नाही. महापुरुषांचे नाव संघटनेला, पक्षाला, शहराला, गावाला दिल्याची अनेक उदाहरणे आहेत. ज्या भ्याड व्यक्तीने हा हल्ला केला त्या व्यक्तीच्या संघटनेचे नाव शिव धर्म फाउंडेशन असे आहे, मग हे नाव एकेरी आहे की आदरार्थी हा प्रश्न त्या भ्याड हल्लेखोराने आधी स्वतःला का विचारला नाही? विरोधी विचारसरणीच्या संघटनेचे नाव काय असावे हे ठरवायचा अधिकार यांना कुणी दिला. यामागे वेगळेच राजकारण शिजत आहे का ? हा प्रश्न आहे.

दीपक काटे हा गुंड भाजप नेते चंद्रशेखर बावनकुळे यांचा निकटवर्तीय आहे. काही महिन्यांपूर्वी पुणे विमानतळावर त्याला रीव्हॉल्वर आणि जिवंत काडतूसांसह पकडण्यात आले होते. इंदापूर एमआयडीसी मध्ये इतर अनेक ठिकाणी खंडणी मागितल्या प्रकरणात त्याच्यावर गुन्हे दाखल आहेत. वेगवगेळ्या गुन्ह्यांमध्ये या टवाळखोर गुंडाचे नाव आहे. अशा गुंडाला राजकीय अभय दिले जात आहे व ही चिंतनिय बाब आहे.

आता असे समजले की, संभाजी ब्रिगेड आणि सर्व समविचारी संघटना या भ्याड हल्ल्याचा निषेध करून थांबणार नाहीत. निवेदने देऊन, निषेध करून थांबणार नाही. सोलापूरकर कोरटकर प्रकरणी सरकारची भूमिका हीच यावेळीही असणार आहे. त्यामुळे हे सततचे हल्ले थांबवण्यासाठी ही विकृती ठेचावीच लागणार आहे आणि ती ठेचणार असे संघटनेने जाहीर केले.

संभाजी ब्रिगेडचा इतिहास तसाच आहे. आता घरात घुसून मारण्याची वेळ सरकारनेच त्यांच्यावर आणली आहे. संभाजी ब्रिगेडचे कार्यकर्ते म्हणतात की, हा हल्ला म्हणजे शिवराय-फुले-शाहू-आंबेडकर विचारधारेवरील हल्ला आहे.

येथील सामान्य कार्यकर्त्यांच्या अस्मितेवर हल्ला आहे. आम्ही कायद्याला मानतो, याचा अर्थ आम्ही निमूटपणे अन्याय सहन करून घेऊ असा होत नाही. आता बस्स आम्ही आता सहन करणार नाही. भगतसिंग यांच्या भाषेत 'हमारे धमाको की गुंज आवाज बनकर गुंजेगी' आम्ही जशास तसे उत्तर देऊ.



थर्ड अम्पायर
जयंत महाजन
jayantmahajansir@gmail.com
मोबा. ९४२०६९१४२०

खरं म्हणजे गायकवाड यांनी शिव-फुले-शाहू-आंबेडकर यांचा विचार समाजात रुजवण्यासाठी आणि बहुजन समाजात अनेक उद्योगपती घडवण्यासाठी अहोरात्र कष्ट घेतले आहे. त्यांच्या अभ्यासाच्या बळावर त्यांनी अनेकांचे मुखवटे उघडे पाडले आहेत आणि हीच खरी चीड डोक्यात ठेऊन या विकृतांनी त्यांच्यावर हल्ला केला.

आजवर कोरटकर, छिंदम, कोश्यारी, सोलापूरकर अशा अनेकांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान केला. ज्यांना विचारांचा सामना विचारांशी करता येत नाही ते असे विकृत कृत्य करतात. या घटनेमागे कोणताही वैयक्तिक वाद नाही, तर ही देशभर चालवली जाणाऱ्या विरोधी विचारांवरच्या हल्ल्यांच्या साखळीतील एक रचना आहे.

विरोधी विचार गप्प करण्यासाठी देशभरात यंत्रबद्ध पद्धतीने अशी भितीदायक संस्कृती राबवली जात आहे. आज जो कोणी जात, धर्म, सामाजिक अन्याय, आर्थिक विषमता यावर प्रश्न उपस्थित करतो, त्याला 'देशद्रोही', 'संस्कृतीद्रोही', 'शिवद्रोही' ठरवण्याचं षड्यंत्र रचलं जात आहे. अक्कलकोटमधील ही घटना त्याच साखळीतील एक धागा आहे.

या घटनेनंतर काही संघटनांनी छत्रपती संभाजी महाराज यांचा एकेरी उल्लेख झाल्याचा आक्षेप घेतला. पण खरा रोष एकेरी उल्लेखावर होता का? की संभाजी ब्रिगेडच्या विवेकवादी, पुरोगामी विचारांवर होता? कृती करणारे कोण? तर ज्यांचा संभाजी ब्रिगेडच्या विचारांशी दीर्घ वैचारिक संघर्ष आहे. पोलीसांनी म्हणे काही लोकांना ताब्यात घेतलं. सरकारच्या गुडबुकमधील माणसाला कोण अटक करणार?

थातूरमातूर कलमं लावून अदखलपात्र गुन्हा तेवढा दाखल होईल. संभाजी ब्रिगेडला स्थापन होऊन कित्येक वर्षे झाली. आतापर्यंत कोणाला संघटनेचं नांव कसं खटकलं नाही? कोणते लोक ही मोहीम चालवत आहे? कोणाची फूस आहे? अगदी सूर्यप्रकाशाएवढी ही बाब स्पष्ट आहे!

### हिस्ट्रीशीटरला शिवभक्त म्हणणं हा अपमान नाही?

छत्रपती शिवाजी महाराज हे स्वाभिमान, नैतिकता आणि लोककल्याणाचा अधिष्ठान असलेली व्यक्ती होती. त्यांनी निर्माण केलेल्या स्वराज्याचं मूळ तत्त्वच होतं, अन्यायाविरुद्ध संघर्ष आणि न्यायासाठी जगणं. पण दुर्दैवाची गोष्ट अशी की, आजकाल खंडणीखोर, हिस्ट्रीशीटर गुन्हेगार देखील स्वतःला शिवभक्त म्हणून सादर करू लागले आहेत आणि काही भंपक अशा विकृत गुंडांचीच पालखी वाहत आहेत. गायकवडांवर झालेला भ्याड हल्ला हा केवळ एका व्यक्तीवर नव्हे, तर शिव-फुले-शाहू-आंबेडकर विचारधारेवर झालेला हल्ला आहे आणि हा हल्ला करणारा इसम कोण? दिपक सीताराम काटे एक नामांकित हिस्ट्रीशीटर गुंड, ज्याच्यावर खंडणी, मारहाण, शस्त्रसाठा, हत्येचा प्रयत्न अशा गंभीर गुन्ह्यांचे आरोप आहेत. तो कधीकाळी पुणे विमानतळावर आर्म आणि ॲम्युनिशन प्रकरणात अटक झालेला इसम आहे. मग अशा व्यक्तीला शिवभक्त म्हणणं ही महाराजांच्या संकल्पनेची विटंबना नाही का? दिपक काटेसारखे गुन्हेगार जेव्हा राजकीय पक्षांच्या सावलीत माजतात, तेव्हा त्यांना संरक्षण मिळतं. जो व्यक्ती समाजातील गरीबांवर दहशत गाजवतो, जो हत्येच्या आरोपाखाली तुरुंगात जातो, जो दमदाटी व खंडणीखोरीसारखे गुन्हे करतो, तो छत्रपती शिवाजी महाराजांचा भक्त कसा काय?

### दुग्धाभिषेक विचारांच्या शुद्धतेचे आणि प्रतीक!

पंढरपूरला दुग्धाभिषेक करून प्रवीण गायकवाड यांना आदराने सन्मानित केले. हा दुग्धाभिषेक केवळ एक धार्मिक विधी नव्हता, तर ते त्या नीच कृत्याच्या विरोधात एक सामुहिक आणि प्रतिकात्मक प्रत्युत्तर होते. शाईफेकीने त्यांच्या शरीरावर डाग पडले असले तरी, त्यांच्या विचारांवर आणि त्यांनी केलेल्या कार्यावर कोणताही डाग पडू शकत नाही, हेच या दुग्धाभिषेकातून अधोरेखित झाले. दुधाच्या शुद्धतेने, त्यांच्यावरील 'डाग' धुऊन काढत, कार्यकर्त्यांनी त्यांचे नेतृत्व आणि निष्ठा पुन्हा एकदा स्वच्छ व निर्मळ असल्याचे सिद्ध केले. या दुग्धाभिषेकातून गायकवाड यांच्यावरील विश्वास आणि त्यांच्या पुरोगामी विचारांना मिळणारा समाजाचा पाठिंबा सहजपणे दिसून आला. हा दुग्धाभिषेक म्हणजे केवळ सन्मान नव्हे, तर तो समाजातील सुजाण नागरिकांचा असा संदेश होता की, आम्ही पुरोगामी विचारांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहोत. असे कृत्य करणारे समाजकंटक कितीही प्रयत्न करोत, पण समाजाला दिशा देणाऱ्या नेत्यांना आणि त्यांच्या कार्याला कमकुवत करू शकणार नाहीत. या घटनेने गायकवाड यांच्यावरील लोकांचा विश्वास आणखी दृढ झाला असून, भविष्यात ते अधिक जोमाने समाजासाठी कार्य करतील याची ग्वाही मिळाली आहे.

---

## महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यावर विचार करतील काय?

काल मन विषण्ण झाले, पुण्यातील डिलिव्हरी बॉयने त्या युवतीवर अत्याचार केला, आज तर त्यावर कळस चढला. जालन्यात एका वाळू तस्कराने एका सतरा वर्षाच्या युवतीच्या वडिलांना तिच्यासमोर बेदम मारले व तिला उचलून नेण्याची भाषा केली.

गेले कैक महीने, वर्ष मी यावर विचार करतोय. आपल्या पुरोगामी, पुढारलेल्या महाराष्ट्र राज्यात बालिकांवर, युवतींवर, महिलांवर जे बलात्कार, अत्याचार होताहेत, वाढतायत त्या मागील मूळ कारण काय आहे? मी बऱ्याच लोकांशी चर्चा केली.

डॉ. अविनाश प. परांजपे
वानाडोंगरी, नागपूर.

काही टवाळखोर, मुलींना छेडणाऱ्या मुलांशी पण बोललो. त्या वरुन मला जे कळले, ते मी समाजासमोर मांडण्याचा प्रयत्न करतोय.

त्याचे मुक्ख्यं कारण जे आढळले, ते म्हणजे आपल्या देशात टिवी चॅनल, सोशल मिडिया वगैरेंवर वर दाखविण्यात येणाऱ्या जाहिराती, सिनेमे हे आहेत. यात तोकड्या कपड्यातील मुली जे अश्लील हावभाव करतात, त्याने सामान्य पुरुषी वैषयिक भावना चळावतात. त्या स्क्रीन वरील जाहिरातीतील मुली, महिला, हिरोईन्स तर मिळणे अशक्य असल्याने, आपल्या आसपासचे सोपे सावज शिकार करणे सहज शक्य असलेले शोधून झडप घालतात. म्हणूनच ट्यूशन क्लासचे ते दोन हरामखोर शिक्षक, स्कूल बसचा ड्राईवर, सारखे लोक युवती नाही तर बलिकांवर अत्याचार करायचे धाडस करतात.

त्यावर आणखीन कळस म्हणजे आपली सुस्त न्याय मिळविण्याची प्रोसीजर. आजतागायत समाजाला खैरलांजीच्या पीडितेला काय न्याय मिळाला हे समजलेच नाही. दृकश्राव्य मिडिया फक्त समाजात उचकविण्याचा उद्देश असल्या सारखे, फक्त त्या पीडितेच्या जातीचाच उल्लेख करून सतत, ब्रेकिंग न्यूज म्हणून दलित मुलीवर अत्याचार, सारखे मथले देऊन बिच्चारीच्या घरच्यांना दुप्पट क्लेश देतात. अत्याचारीत पिडीता कोठल्याही जाती धर्माची असु द्या, तिची पीडा तर सारखीच असणार ना? पण लक्ष्यात कोण घेतो? या लिंग पिसाटांना झालेली शिक्षा कधीही पुढे आलेली दिसत नाही. एखाद्या निर्भया केस सारखी सोडून. पण ही मंडळी का बरे इतकी पिसाट झाली? यावर सरकारचे लक्ष वेधणे आवश्यक आहे.

टीव्ही च्या एका मासिक पाळीचे वेळी वापरावे असे त्या सॅनिटरी नॅप्किनच्या जाहिरातील डझन भर मुली ह्या जवळ जवळ विवस्त्रच दाखवितात. ह्या आणि असल्या जाहिरातींच्यावर निदान आपल्या राज्यात तरी पूर्णतः बंदी घालण्यात यावी. ह्या दृकश्राव्य जाहिरातींवर काही सेन्सॉर बोर्ड आहे की नाही? असल्यास पैसे खाऊन परवानगी देतात की काय?

जुन्या काळी साधे चुंबन दृश्यास सेन्सॉर परवानगी देत नसे, दोन फुले एकमेकांना स्पर्श करून दाखवीत. म्हणजे सेन्सॉर बोर्ड च्या कायद्यात बदल किती केला आहे? अभिव्यक्ती स्वातंत्र्य नावाखाली उद्या समागम दाखवतील काय?

■ ■ ■

## शिंदेंसेनेत भाकरी फिरणार?



गेल्या काही दिवसांपासून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा शिवसेना हा पक्ष चांगलाच चर्चेत आहे. या पक्षातील मंत्री आणि काही आमदार यांच्यावर वेगवेगळे आरोप करण्यात आले आहेत. असे असतानाच आता या पक्षाबाबत मोठी माहिती समोर आली आहे. या पक्षात लवकरच अंतर्गत निवडणूक घेतल्या जाण्याची शक्यता आहे. तशी तसे संकेत शिंदे गटाचे नेते दीपक केसरकर यांनी दिले आहेत.

आज पक्षाची महत्त्वाची बैठक पार पडली. आजच्या बैठकीत लोकशाहीबाबतचा मुद्दा होता. मध्यंतरीच्या काळात पक्षात अंतर्गत निवडणुका घेण्याची पद्धत पुन्हा सुरू करण्यात आली. पक्षात निवडणूक घेण्याची पद्धत संपली होती. ती आता पुन्हा सुरू झाली आहे, असे सांगत एखादा बोगस व्यक्ती असेल तर त्याला बाहेर केलं पाहिजे यावरही सविस्तर चर्चा झाल्याचे केसरकर यांनी सांगितले.

अजून कार्यकर्त्यांच्या म्हणजेच स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका व्हायच्या आहेत. विधानसभा निवडणुकीत सर्वात जास्त स्ट्राईक रेट हा शिवसेनेचा आहे. पक्षाच्या निवडणुका होत असताना या निवडणुकीतून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा पाया रचला जाईल, असे मतही केसरकर यांनी व्यक्त केले.

**लोकशाही पद्धतीने निवडणूक**

तसेच पक्षांतर्गत निवडणुकीबाबतचा निर्णय एकनाथ शिंदे यांनी अजून दिलेला नाही. यासंदर्भात चर्चा झाली असली अद्याप एकनाथ शिंदे यांनी याबाबत ठोस निर्णय दिलेला नाही. शिवसेना पक्षात सर्वच पदांसाठी निवडणूक होणार आहे. ही संपूर्ण राष्ट्राची निवडणूक असेल, असेही केसरकर यांनी सांगितले. आमच्या पक्षात लोकशाही पद्धतीने निवडणूक होणार आहे, हेदेखील केसरकर यांनी आवर्जुन सांगितले. दरम्यान, दीपक केसरकर यांनी शिंदेंच्या शिवसेनेत वेगवेगळ्या पदांसाठी निवडणूक होणार आहे, असे संकेत दिले आहेत. त्यामुळे आता भविष्यात नेमके काय होणार? तसेच एकनाथ शिंदे यांना कोणते पद दिले जाणा? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

■ ■ ■

## आता लवकरच नक्षलमुक्त भारत

डाव्या विचारसरणीचा अतिरेकीपणा किंवा नक्षलवाद हा देशाच्या अंतर्गत सुरक्षेसाठी सर्वात मोठा धोका आहे.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी म्हटले आहे की, मार्च २०२६ पर्यंत देश डाव्या विचारसरणीच्या अतिरेकीपणापासून मुक्त होईल. २००४-२०१४ च्या तुलनेत २०१४ ते २०२४ या काळात एनडीए राजवटीत संघर्षामुळे होणाऱ्या घटनांमध्ये ५३ टक्के घट झाली आहे आणि सुरक्षा कर्मचारी आणि नागरिकांच्या मृत्युदरात ७० टक्के घट झाली आहे.

हे लक्षात घेण्यासारखे आहे की नक्षलवादाची सुरुवात पश्चिम बंगालमधील नक्षलबारी नावाच्या एका दुर्गम मागासलेल्या गावात जमीनदार किंवा सरंजामशाहींविरुद्ध झालेल्या हिंसक जमीन वादानंतर सुरू झालेल्या चळवळी म्हणून झाली.

भारतात नक्षलवादाच्या प्रसाराच्या कारणांबद्दल बोलायचे झाले तर, नक्षलवाद अशा भागात पसरला आहे जे मूलभूत नागरी सुविधांपासून वंचित आहेत आणि जिथे लोक गरिबीचा सामना करत आहेत. कमकुवत प्रशासन आणि योग्य पायाभूत सुविधांच्या अभावामुळे नक्षलवाद फोफावला आहे. देशातील डाव्या विचारसरणीच्या अतिरेकी प्रभावाखाली असलेल्या राज्यांमध्ये ओडिशा, बिहार, छत्तीसगड आणि झारखंडचा काही भाग यासह ११ राज्यांचा समावेश आहे.

२०१७ मध्ये सुरू करण्यात आलेले ऑपरेशन समाधान मोहीम अतिरेकीवादाचा मुकाबला करण्यासाठी आणि प्रभावित भागात सुरक्षा वाढवण्यासाठी धोरणात्मक दृष्टिकोनावर लक्ष केंद्रित करते.

सरकारने डाव्या विचारसरणीच्या अतिरेकी गटांविरुद्ध गुप्तचर यंत्रणेवर आधारित, लक्षित कारवाई केली. संपार्श्विक नुकसान कमी करण्यासाठी आणि समुदायाची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी खबरदारी घेण्यात आली.

आता, नक्षलमुक्त भारतासाठी सरकार ज्या तीन आघाड्यांवर काम करत आहे त्यामध्ये आत्मसमर्पण करणाऱ्यांचे स्वागत करणे, हिंसाचाराचा मार्ग न सोडणाऱ्यांना अटक करणे आणि लोकांचे जीव घेण्यास तयार असलेल्या नक्षलवाद्यांना शिक्षा करणे यांचा समावेश आहे. तसेच, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली, नक्षलग्रस्त राज्यांच्या सरकारांनी नक्षलवादामुळे मागासलेल्या गावांच्या आणि लोकांच्या कल्याणासाठी टप्प्याटप्प्याने योजना आखली आहे.



ॲड. आकाश सपेलकर
वकील सर्वोच्च न्यायालय

नक्षलवाद प्रभावित भागांसाठी घरे मंजूर करण्यात आली आहेत आणि प्रत्येक गावात सरकारी कल्याणकारी योजनांची १००% पूर्तता सुनिश्चित करण्यासाठी आणि नक्षलवादामुळे प्रभावित कुटुंबांना प्राधान्य देण्यासाठी काम केले जात आहे. एकंदरीत, मोदी सरकार 'नक्षलमुक्त भारत' करण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे आणि मार्च २०२६ पर्यंत देश नक्षलमुक्त होईल अशी अपेक्षा आहे.

■ ■ ■

### वाचक लिहितात

## आई प्रथम गुरु

काही दिवसापूर्वी आपण सर्वांनी गुरुपौर्णिमा साजरी केली. गुरुप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस म्हणजे गुरुपौर्णिमा. आपली आई ही आपली प्रथम गुरु असते. स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी. आई म्हणजे ईश्वराचे रूप, आई म्हणजे निस्वार्थ प्रेमाचे स्वरूप, आई म्हणजे वात्सल्य सिंधू, आई म्हणजे संरक्षण कवच. आईचे ऋण हे कधीच फेडता येत नाही.

जगराहाटी प्रमाणे वडिलांनी मुलांच्या पालन पोषणासाठी कष्ट करून पैसे आणणे व आणलेल्या पैशातून आई आपल्या मुलांचे पालन पोषण करत असते हे करत असताना ती मुलांना संस्कार देखील देत असते. आई ही आईच असते मग ती कोणाची का असेना अगदी प्राण्यांपासून मनुष्यापर्यंत. ती आपल्या मुलांची काळजी घेते. दिवसेंदिवस माणूस आईचे ऋण विसरून तिला गृहीत धरून लागला आहे.

आम्हाला जन्म दिला आहे म्हणजे आमची सर्व जबाबदारी आई-वडिलांवर आहे. लग्न झाल्यानंतर मुलगा आपल्या बायकोच्या आई-वडिलांना आपल्या घरात आणतो व आपल्या आई-वडिलांना वृद्धाश्रमात पाठवतो. जेव्हा ते आई-वडील होतात तेव्हा त्यांना आपल्या आई-वडिलांची अडचण वाटते व ते त्यांना आश्रमात किंवा दोन भाऊ असतील तर काही कालावधीसाठी एकाकडे व काही कालावधीसाठी दुसऱ्याकडे पाठवतात.

आई-वडील वस्तू नाहीत. ती माणसे आहेत, त्यांनाही भावना आहेत. त्यांना मुलांचा पैसा नको असतो तर चार क्षण प्रेमाचे हवे असतात. मुलांना शिकून सवरून मोठे केल्यावर ते आई-वडिलांना सोडून परदेशात स्थायिक होतात.

इकडे आई-वडील मात्र त्यांचा आवाज ऐकण्यासाठी व त्यांना पाहण्यासाठी दिवसेंदिवस वाट पाहत असतात. त्यांचा फोन आला की त्यांना पुढील काही दिवस मुलांची वाट पाहण्याची शक्ती मिळते.

आजच्या जगात पैशाला सर्वश्रेष्ठ मानले जात आहे व ते कामाविण्यासाठी ते आई वडिलांना सोडून जातात. त्यामुळे आई-वडिलांच्या मृत्यूनंतर त्यांच्या अंत्यविधीला येण्याची तसदी सुद्धा मुलं घेत नाही. पैसे पाठवून कोणालातरी अंत्यविधी करायला सांगतात. ज्या घरात आई-वडिलांच्या डोळ्यातून पाणी येते त्या घरात कधीच सुख, शांती, समाधान, आरोग्य नांदत नाही. वडील एक वेळ क्षमा करणार नाही पण कितीही चुका केल्यात तरी आई आपल्या मुलांना क्षमा करते क्वचित प्रसंगी ती वडिलांशी विरोध करते.

आईप्रमाणेच आपली कुलदेवी ही आपल्या आध्यात्मिक उन्नतीसाठी प्रयत्न करत असते. आपल्या पूर्व जन्माची पुण्याई म्हणून आपण विशिष्ट कुळात जन्म घेतो. जन्ममृत्यूच्या फेऱ्यातून सुटका होण्यासाठी आपली कुलदेवी आपल्याला मदत करून आपली साधना करून घेते म्हणून सतत तिचे नामः स्मरण करणे हे जरुरी आहे. आपली कुलदेवी आपल्यात कमी असलेल्या देवतत्त्वाचे पूर्णत्व करते तिच्या कृपेमुळे आपल्या कुळाचा उद्धार होतो.

आई, कुलदेवी याच प्रमाणे आपली एक माता, जननी असते ती म्हणजे आपली मातृभूमी. आज आपल्या देशात अनेक आक्रमणा होत आहे त्यामुळे देशाची सुरक्षितता धोक्यात आहे. आपल्या सर्वांचे कर्तव्य आहे की आपल्या देशासाठी सर्वस्व अर्पण करून देशाचं संरक्षण करणे. ही काळाची गरज समजून आपण सर्वांनी योग्य पावले उचलली पाहिजे. सर्व मातांना नमस्कार.

■ लीना गाडगीळ, पनवेल.

## वडापाव, समोसे आवडीने खाताय? थांबा! आता सरकारच देणार हेल्थ अलर्ट



ज्याप्रकारे सिगारेटच्या पाकिटावर धोक्याचा इशारा छापलेला असतो, त्याचप्रकारे आता तेलकट आणि गोड पदार्थांच्या बाबतीतही संभावित धोक्याचं फलक केंद्र सरकारच्या अखत्यारित असलेल्या सर्व कार्यालयांमधील उपहारगृहांमध्ये लावले जाणार आहेत. याबाबत केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने परिपत्रक प्रसिद्ध केलं आहे. या पदार्थांमध्ये समोसे, वडापाव, कचोरी, पिज्झा यांचा समावेश आहे.

कार्यालयांमधील कँटीनमध्ये तेलकट, गोड सेवनासंदर्भात धोक्याचा इशारा लावण्याचे आदेश केंद्र सरकारने सर्व कार्यालयांना दिले आहेत.

कँटीनमध्ये लावल्या जाणाऱ्या फलकात काय असावं हे परिपत्रकात नमूद करण्यात आलं आहे. त्यात तेलकट आणि गोड खाद्यपदार्थांच्या चित्रासह त्यापुढे त्यामध्ये किती ह्यफॅटह्ण आहे हेदेखील सांगण्यात यावं. त्यानुसार, एक वडापावमध्ये 10 ग्रॅम फॅट, एक समोशामध्ये 17 ग्रॅम फॅट, दोन कचोरींमध्ये 10 ग्रॅम फॅट, 10 भजींमध्ये 14 ग्रॅम फॅट, 1 गुलाबजाममध्ये 32 ग्रॅम साखर, 1 कोल्ड ड्रींकमध्ये 32 ग्रॅम साखर असल्याचं सांगण्यात आलं आहे.

केंद्रीय कार्यालयांमधील कँटीनमध्ये तेल आणि गोड पदार्थांबाबत सावधतेचे फलक लावले जाणार आहेत. रोजच्या अन्नातील तेलकट आणि गोड पदार्थांमध्ये फॅट आणि शुगर किती आहे, याची माहिती या फलकाद्वारे दिली जाणार आहे. असे फलक केंद्र सरकारचे कार्यालय, लॉबी, बैठक कक्ष यांसर इतरही सार्वजनिक ठिकाणी लावण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

देशात मुलांमध्ये आणि प्रौढांमध्ये लठ्ठपणाचं प्रमाण झपाट्याने वाढत आहे. शहरात पाचपैकी एक प्रौढ व्यक्ती लठ्ठ आहे. याला बालपणापासून असलेल्या आहाराच्या सवयी जबाबदार असतात. लठ्ठपणामुळे मधुमेह, उच्च रक्तदाब, हृदयरोग आणि काही विशिष्ट कर्करोग यांसारख्या आजारांचा धोका असतो. शिवाय मानसिक आरोग्य, हालचाल आणि लाइफस्टाइलवरही त्याचा परिणाम होतो. जागतिक आरोग्य संघटनेच्या आकड्यांनुसार, भारतात 7.7 कोटी लोकांना मधुमेह आहे. 2050 पर्यंत ही संख्या वाढून 44.9 कोटींपर्यंत पोहोचू शकते. त्यामुळे फिट इंडिया अभियानाअंतर्गत भारत सरकारने हे पाऊल उचललं आहे.

■ ■ ■

### अशोकायन



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

## प्रवाशांची गैरसोय?

एस.टी .च्या व्यवस्थापनात
राहिला नाही दम
अद्यावत वेळापत्रकाचीही
दक्षता घेत नाही व्यवस्थापन..

वाढल्या नविन फेऱ्या
नोंद नाही त्यात
बंद झालेल्या फेऱ्याही
वेळपत्रकात दिसतात ..!

टायमिंग व लालपरीचं
असतं अतुट नातं
प्रवाशांना मनस्ताप होतो
संबंधितांना नाही कां कळत?

# घुईखेड खारवगळ नाल्यावर लवकरच पूल

## आमदार प्रताप अडसड यांचे आश्वासन

**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर रेल्वे,( दि.15 )-** घुईखेड येथील खारवगळ नाल्यावर पूल बांधण्याची मागणी गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असून, आता या कामास प्रथम प्राधान्याने सुरुवात करण्यात येईल, असे आश्वासन आमदार प्रताप अडसड यांनी दिले आहे. नुकत्याच झालेल्या पावसामुळे शेतकरीवर्गाला शेतात जाण्यासाठी नाल्याचा धोकादायक मार्ग पार करावा लागत असल्याने ही मागणी आणखी तीव्र झाली आहे.

गेल्या काही दिवसांत झालेल्या संततधार पावसामुळे खारवगळ नाल्याला पूर आला आहे. त्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांना शेतात पोहोचण्यासाठी मोठा त्रास सहन करावा लागत आहे. काही ठिकाणी मजूरही शेतात अडकून पडल्याचे प्रकार घडले आहेत. या परिस्थितीवर चिंता व्यक्त करत शेतकऱ्यांनी प्रशासन आणि लोकप्रतिनिधींना वेळोवेळी निवेदने दिली आहेत. मात्र, अद्याप पूल बांधण्याच्या कामाला सुरुवात झालेली नाही.

या संदर्भात पत्रकारांशी बोलताना आमदार प्रताप अडसड यांनी सांगितले की, खारवगळ नाल्यावरील पूल बांधण्यासाठी आवश्यक निधी मागील अर्थसंकल्पात सुचवण्यात आला होता. मात्र, खर्च अधिक असल्यामुळे प्रक्रिया थोडी लांबली आहे. तरीही आम्ही सातत्याने पाठपुरावा करत आहोत. या कामास प्रथम प्राधान्य देण्यात येईल.



### प्रशासनाकडून दुर्लक्ष केल्याचा आरोप

या ठिकाणी पूल नसल्यामुळे दरवर्षी पावसाळ्यात शेतकऱ्यांना जीव धोक्यात घालून नाल्यातून वाट काढावी लागते. ही परिस्थिती अनेक वर्षांपासून सुरू आहे. त्यामुळे शेतकरी आणि स्थानिकांनी संताप व्यक्त केला आहे.माजी जिल्हा परिषद सदस्य प्रविण घुईखेडकर, म्हणाले, मी वेळोवेळी प्रशासनाशी पत्रव्यवहार करून या पुलासाठी पाठपुरावा केला आहे. अंदाजपत्रक तयार करून जिल्हा नियोजन समितीकडे प्रस्तावही पाठवण्यात आला. मात्र अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. स्थानिक शेतकऱ्यांच्या सुरक्षेसाठी हा पूल तातडीने मंजूर व्हावा.स्थानिक शेतकरी संजय गिरूळकर, म्हणाले, दरवर्षी पावसाळ्यात आम्हाला नाल्यातून प्रवास करावा लागतो. ही फारच धोकादायक बाब आहे. प्रशासन व लोकप्रतिनिधींनी आता तरी याकडे गांभीर्याने लक्ष द्यावे आणि लवकरात लवकर पूल उभारावा.

# राजुरा व लोणी मंडळातील शेतकऱ्यांना नुकसान भरपाईसाठी विलंब का?

## ▸ आ. उमेश यावलकर सभागृहात गरजले ▸ दै.महासागर ने उचलला होता मुद्दा




**महासागर प्रतिनिधी**

वरुड (दि.15)- राजुरा व लोणी बाजार मंडळातील शेतकऱ्यांना अतिवृष्टी आणि गारपीटमुळे झालेल्या शेती पिकांच्या नुकसानीची नुकसान भरपाई अद्याप मिळालेली नाही. त्यामुळे यासंबंधी शासनाने घेतलेल्या विलंबाचा मुद्दा आमदार उमेश यावलकर यांनी सोमवार, 14 जुलै रोजी राज्य विधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात जोरदारपणे मांडला. या मुद्दयावर दैनिक महासागर ने 28 जून 2025 च्या अंकात बातमी प्रकाशित करुन यावर सत्ताधारी आमदारांचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला होता हे विशेष.

वरूड तालुक्यातील लोणी व राजुरा बाजार मंडळात नोव्हेंबर व डिसेंबर 2023 मध्ये अतिवृष्टी तर एप्रिल 2024 मध्ये दोनदा गारपीट झाली होती. यामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले. शासनाने जानेवारी 2024 रोजी अतिवृष्टीसाठी तर ऑगस्ट 2024 रोजी गारपीटीसाठी नुकसान भरपाईचे निर्णय घेतले. शेतकऱ्यांनी यासाठी केवायसी प्रक्रिया पूर्ण केली, मात्र अद्याप अनेक शेतकऱ्यांचे अनुदान थांबवण्यात आले आहे.

विदर्भातील संत्रा उत्पादक शेतकरी वर्षातून दोन वेळा मृग व अंबिया या बहारात संत्रा व मोसंबीचे उत्पादन घेतात. मात्र यावर्षी झालेल्या हवामानाच्या तडाख्यामुळे त्यांना दोन्ही हंगामात मोठ्या नुकसानीचा सामना करावा लागला. तरीही शासनाच्या धोरणांमुळे फक्त एकदाच मदत मिळत आहे, हे अन्यायकारक असल्याची जोरदार भूमिका यावलकरांनी सभागृहात मांडली.


महासागर
अतिवृष्टी : नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना कधी मिळणार मदत
अपुर्ण केवायसीचा खोडा

डॉ. पंजाबराव कृषी विद्यापीठाच्या अहवालाचा दाखला देत यावलकरांनी मृग व अंबिया हे दोन वेगळे हंगाम असल्याचे स्पष्ट केले. एका हंगामात दोनदा नुकसान झाल्यास अनुदान मिळत नाही, मात्र दोन वेगवेगळ्या हंगामात नुकसान झाल्यास अनुदान द्यावं लागतं. त्यामुळे 2024 मध्ये झालेल्या गारपीटीसाठी मदत मिळण्यात होणारा विलंब दुर्दैवी असल्याचं त्यांनी ठासून सांगितलं.

शासनाने धोरणात सुधारणा केल्यास संपूर्ण विदर्भातील संत्रा व मोसंबी उत्पादक शेतकऱ्यांना याचा थेट लाभ होणार आहे. यावलकरांनी दिलेली सडेतोड मांडणी ही शेतकऱ्यांच्या न्याय हक्कासाठी महत्त्वाची ठरली आहे.

# सीताबाई संगई हायस्कूलच्या विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती परीक्षेत मोठे यश



**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव सुर्जी,( दि.15 )-** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्यावतीने आयोजित शिष्यवृत्ती परीक्षा 2025 मध्ये सीताबाई संगई हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवले आहे. शाळेतील इयत्ता 8 वीतील 14 विद्यार्थ्यांनी परीक्षा उत्तीर्ण केली असून, त्यामधील 10 विद्यार्थ्यांनी गुणवत्ता यादीत स्थान मिळवले आहे.

विशेष म्हणजे, देवांश मनीष येवले या विद्यार्थ्याने जिल्ह्यातून प्रथम क्रमांक मिळवत शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. त्याचबरोबर मिहीर राजेंद्र टांक याने द्वितीय क्रमांक मिळवून यशाची परंपरा पुढे चालवली आहे. इतर गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये अथर्व शरद राजस, पार्थ गजेंद्र येऊल, पीयूष अमोल डहाळे, पार्थ नरेश भोंडे, वैभव मनोहर अस्वार, उत्कर्ष चंद्रकांत


### देवांश येवले जिल्ह्यात प्रथम

बोरोडे, चैतन्य निलेश येऊल, आणि रचित रघुनाथ मळसणे यांचा समावेश आहे. इयत्ता 5 वीच्या गटातून 4 विद्यार्थ्यांनी यश मिळवले असून, त्यामधून सम्यक मनीष जोहरापूरकर, अर्णव प्रवीण जयस्वाल आणि श्रीरंग तुषार सरोदे या तीन विद्यार्थ्यांनी गुणवत्ता यादीत स्थान मिळवले आहे.या यशाबद्दल सीताबाई संगई एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष अविनाश संगई, उपाध्यक्ष उल्हास संगई, सचिव विवेक संगई, सहसचिव प्रसाद संगई, अजय संगई व सर्व सभासद मंडळ, मुख्याध्यापक राकेश डोणगावकर, उपमुख्याध्यापक राजेश वैद्य, पर्यवेक्षक निलेश डाहाळे आणि संपूर्ण शिक्षकवृंद यांनी विद्यार्थ्यांचे मन:पूर्वक अभिनंदन केले आहे.

# अमरावतीच्या मंदारिन संत्र्यांना ‘एक जिल्हा, एक उत्पादन-2024’ मध्ये कांस्यपदक

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 15 ) -** ‘एक जिल्हा, एक उत्पादन-2024’ या केंद्र सरकारच्या राष्ट्रीय उपक्रमात अमरावती जिल्ह्याच्या मंदारिन संत्र्यांनी कृषी क्षेत्रातील ‘अ’ श्रेणी अंतर्गत तृतीय क्रमांक पटकावून कांस्यपदक मिळवले आहे. संत्रा उत्पादनातील सातत्य, उत्कृष्ट गुणवत्ता आणि बागायती क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीमुळे हा सन्मान मिळाला.




जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक नीलेश निकम यांनी नवी दिल्ली येथील भारत मंडपममध्ये झालेल्या कार्यक्रमात हा पुरस्कार स्वीकारला. या वेळी केंद्रीय वाणिज्य व उद्योग मंत्री पीयूष गोयल, दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता व राज्यमंत्री जितिन प्रसाद उपस्थित होते. ‘एक जिल्हा, एक उत्पादन’ हा केंद्र सरकारचा उपक्रम असून, जिल्ह्याच्या खास उत्पादनांना प्रोत्साहन देऊन जागतिक स्तरावर पोहोचविण्याचा यामागे उद्देश आहे. अमरावतीच्या संत्र्यांनी राष्ट्रीय स्तरावर आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे.

# सर्व विभागांनी संवेदनशील घटकांसाठी सचेत राहावे

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.15 ) -** कोणत्याही घटकांशी भेदभाव न करता संवेदनशीलतेने वागण्याचे आवाहन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी केले. ते जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण समितीच्या बैठकीत बोलत होते. एचआयव्ही संक्रमित व्यक्ती, तृतीयपंथीय, वेश्या व्यवसायातील स्त्रिया, स्थलांतरित कामगार, ट्रकचालक आणि त्यांच्या सहकाऱ्यांना सरकारी योजनांचा लाभ देताना सर्व विभागांनी विशेष दक्षता घ्यावी, असे ते म्हणाले. या बैठकीत तृतीयपंथी व्यक्तीने दत्तक घेतलेल्या बाळाचे लिंग प्रमाणपत्र जिल्हाधिकारी यांच्या हस्ते सुपूर्त करण्यात आले. या प्रकरणात अडचण निर्माण झाल्यानंतर विशेष समिती स्थापन करून निर्णय घेण्यात आला.या वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दिलीप सौंदळे, आरोग्य अधिकारी डॉ. सुरेश आसोले यांच्यासह विविध अधिकारी उपस्थित होते. बैठकीत आरोग्य विषयक योजनांचा आढावा घेण्यात आला.

# विषारी औषध प्राशन



**अमरावती** – नांदगांवपेठ पोलीस ठाणे क्षेत्रातील कठोरा बु. येथील रहिवासी रमेश रुपराव बोंडे (वय 56) यांनी 12 जुलै रोजी दुपारी 4 वाजताच्या सुमारास राहत्या घरी विषारी औषध प्राशन केले. यानंतर कुटुंबीयांनी त्यांना तात्काळ पीडीएमसी रुग्णालयात दाखल केले. मात्र उपचारादरम्यान 14 जुलै रोजी त्यांचा मृत्यू झाला. नांदगांवपेठ पोलिसांनी याप्रकरणी आकस्मिक मृत्यूची नोंद घेतली आहे.

# बांधिलकी प्रतिष्ठानतर्फे ‘कापडी पिशवी दिन’ साजरा

## पर्यावरण रक्षणासाठी विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.15 )-** बांधिलकी प्रतिष्ठान, अमरावती व बांधिलकी सार्वजनिक वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने पर्यावरण संवर्धनाच्या उद्देशाने ‘कापडी पिशवी दिन’ साजरा करण्यात आला. गोविंदपूर व उतखेड येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमध्ये वृक्षारोपण, जनजागृती व कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आले.

विद्यार्थ्यांना कविता, गीते व संवादाच्या माध्यमातून प्लास्टिकमुक्त पर्यावरणाचे महत्त्व समजावण्यात आले. कापडी पिशवीच्या पर्यावरणपूरक उपयोगांबाबत



माहिती देत प्रत्येक विद्यार्थ्याला पिशवी भेट देण्यात आली. कार्यक्रमात संचालिका. सीमा भांदर्गे यांनी पर्यावरण रक्षणासाठी प्रत्यक्ष कृतीचे महत्त्व अधोरेखित केले. संगीत विशारद छाया पाथरे यांनी पर्यावरण गीत सादर करत विद्यार्थ्यांनाही सहभागी करून घेतले. प्रसिद्धीप्रमुख विकास राऊत व हेमा राऊत यांनी पर्यावरणपूरक सवयींविषयी मार्गदर्शन केले.संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा ॲड. डॉ. नीता प्रफुल्ल कचवे यांनी विद्यार्थ्यांना ‘पृथ्वी ही जीवनदायिनी आई’ असल्याचे समजावत स्वत: रचलेले पर्यावरण गीत विद्यार्थ्यांकडून सादर करून घेतले. मुख्याध्यापक व शिक्षकांचे सहकार्य, शाळेच्या परिसरातील शिस्तबद्ध आयोजन, व वृक्षदानासाठी जनसेवक महेश मुलचंदानी व मंजू अडवाणी यांचे योगदान उल्लेखनीय ठरले.

# हिरवी वांगी बनवताहेत शेतकऱ्यांना मालामाल

## अचलपूर तालुक्यातील शेतकऱ्यांची यशोगाथा

**नितीन दुर्बडे**

**पथ्रोट,( दि.15 ) –** अचलपूर तालुक्यातील काही निवडक गावांनी शेतीतून आर्थिक समृद्धीचे नवे पर्व सुरू केले आहे. विशेषत: हिरवी वांगी या भाजीपाला पिकामुळे येथील शेतकरी अक्षरश: मालामाल होत आहेत. सिंचन सुविधा उपलब्ध असल्यामुळे इथे विविध फळपिके व भाजीपाला घेतला जातो, पण सध्या हिरव्या वांग्याचे उत्पादन हे शेतकऱ्यांसाठी सोन्याची खाण ठरत आहे.

पथ्रोट, परसापूर, हरम या गावांतील शेतकरी दररोज शेकडो टन वांगी तयार करून मध्य प्रदेश, छत्तीसगड, ओडिशा, तेलंगाणा, आंध्रप्रदेश, तामिळनाडू



या राज्यांत पाठवत आहेत. केवळ अचलपूर तालुक्यातून दररोज 100 टनपेक्षा अधिक हिरवी वांगी परराज्यांत निर्यात केली जाते. या पिकातून एक एकर शेतीमधून आठवड्याला 10 हजार रुपयांपेक्षा जास्त उत्पन्न मिळते. तर सहा महिन्यांत एकाच शेतकऱ्याला 3 ते 10 लाख रुपयांपर्यंत उत्पन्न मिळण्याचे उदाहरण दिसून येत आहे.

महाशिवरात्रीपासून बीज लागवड सुरू होते. एप्रिलङ्क्मे महिन्यांत रोपे लावली जातात, तर जूनपासून डिसेंबरपर्यंत वांगीचे उत्पादन सुरू राहते. प्रत्येक आठवड्याला तोडणी होते आणि शेतातूनच थेट विक्री केल्यामुळे बाजारपेठेची गरज भासत नाही. विक्रीनंतर दुसऱ्याच दिवशी पैसे मिळतात, हे यशाचे आणखी एक महत्त्वाचे कारण आहे.एकीकडे पारंपरिक पिकांमधून उत्पन्न कमी होत असल्याची ओरड आहे, तिथे अचलपूर तालुक्यातील या हिरव्या वांग्याच्या उत्पादनाने कोट्यवधी रुपयांची उलाढाल निर्माण केली आहे. जांभळ्या वांग्याच्या तुलनेत हिरव्या वांग्यांना अधिक मागणी असल्याचे व्यापाऱ्यांचे म्हणणे आहे. अकोला, यवतमाळ, नागपूर, भंडारा या जिल्ह्यांत हिरवी वांगी विशेष पसंतीस उतरली आहे. अचलपूर तालुक्यातील या शेतकऱ्यांनी दाखवलेला मार्ग म्हणजे परिस्थितीचा योग्य अभ्यास, दर्जेदार उत्पादन आणि थेट विक्री व्यवस्थापन याचे उत्तम उदाहरण म्हणावे लागेल.

# परसोडी रोडवरील बेकायदेशीर मास विक्रीमुळे नागरिक त्रस्त

**महासागर प्रतिनिधी**

**धामणगाव रेल्वे, ( दि.15 )-** परसोडी रोड परिसरात सुरू असलेल्या बेकायदेशीर मास विक्रीमुळे साईनगर व श्रीकृष्ण पेठ भागातील नागरिकांचा त्रास दिवसेंदिवस वाढत आहे. मास विक्रीच्या ठिकाणी अस्वच्छता, दुर्गंधी आणि कुत्र्यांचा सुळसुळाट यामुळे विशेषत: शालेय विद्यार्थ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

या पार्श्वभूमीवर नुकतीच एक गंभीर घटना घडली. शाळेत जात असलेल्या एका विद्यार्थिनीवर मास विक्रीजवळ भटकणाऱ्या कुत्र्यांनी अचानक हल्ला केला. तिच्या ओरडण्याने



## विद्यार्थिनीवर कुत्र्यांचा हल्ला

नागरिक धावून आले व प्राण वाचवण्यात यश आले. मात्र ती गंभीर जखमी झाली असून, या घटनेमुळे परिसरात संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.या प्रकाराची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी आमदार प्रतापदादा अडसड यांच्याकडे धाव घेत निवेदन दिले. त्यांनी या तक्रारीची गांभीर्याने दखल घेतली आणि धामणगाव रेल्वे नगरपरिषद मुख्याधिकारी, पोलीस निरीक्षक, पंचायत समितीचे BDO तसेच जुना धामणगाव ग्रामपंचायतला तातडीने कारवाईचे आदेश दिले. आमदार अडसड यांनी स्पष्टपणे सांगितले की, ‘शहराच्या स्वच्छता व नागरिकांच्या सुरक्षिततेशी खेळण्याचा अधिकार कोणालाही नाही. बेकायदेशीर मास विक्री करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल.’ या विषयावर भाजप युवा मोर्चा विधानसभा प्रमुख अखिलेश पोळ यांनीही प्रतिक्रिया देताना प्रशासनाकडून त्वरित पावले उचलण्याची मागणी केली आहे. ‘विद्यार्थ्यांच्या जिवाशी खेळ होतोय, हे खपवून घेणार नाही,’ असे त्यांनी सांगितले.

# ब्लू आधार कार्ड घरबसल्या मिळणार

## युआयडीआय अधिकारी थेट घरी येणार




### कशी करावी अर्ज प्रक्रिया ?

इंडिया पोस्ट पेमेंट्स बँकेच्या अधिकृत वेबसाइटवर भेट द्या, ‘Service Request’ या पर्यायावर क्लिक करा, ‘IPPB Customers’ निवडा, ‘Child Aadhar Enrollment’ या पर्यायावर क्लिक करा,अर्जात नाव, पत्ता, मोबाईल क्रमांक व जवळच्या पोस्ट ऑफिसची माहिती भरून फॉर्म सबमिट करा, अर्ज सबमिट केल्यानंतर 10 दिवसांच्या आत पोस्ट ऑफिस कर्मचारी घरी येऊन आधार नोंदणीची प्रक्रिया पूर्ण करतील.ही सुविधा पालकांसाठी अत्यंत सोयीची असून, लहानग्यांचे आधार कार्ड सहजतेने आणि सुरक्षित वातावरणात तयार होणार आहे. युआयडीआय चा हा उपक्रम स्वागतार्ह आणि पालकांसाठी दिलासा देणारा ठरत आहे.

**पथ्रोट, 15 जुलै ( प्रतिनिधी )-** नवजात व लहान बालकांसाठी आता ब्लू आधार कार्ड मिळवण्यासाठी केंद्रावर जाण्याची गरज नाही. युआयडीआय (भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरण) ने एक नवी सेवा सुरू केली असून, याअंतर्गत अधिकारी थेट नागरिकांच्या घरी येऊन बालकांचे ब्लू आधार कार्ड तयार करतील.

आधार कार्ड हे आज सर्वसामान्य नागरिकाच्या ओळखीचा अत्यंत महत्त्वाचा दस्तावेज बनला आहे. शैक्षणिक, बँकिंग, सरकारी योजना व मोबाईल सिमसारख्या विविध सेवा घेण्यासाठी आधार अनिवार्य आहे. लहान मुलांसाठीचे विशेष कार्ड म्हणजे ब्लू आधार, जे त्यांच्या पालकांच्या आधार क्रमांकाशी लिंक असते. लहान मुलांचे आधार कार्ड तयार करताना केंद्रावर नेणे, बायोमेट्रिक नोंदणी करणे अशा अनेक अडचणी पालकांना भेडसावत होत्या. अनेक वेळा मुलं रडतात, घाबरतात. ही अडचण दूर करण्यासाठी युआयडीआय ने घरपोच सेवा सुरू केली आहे.




# लाभ रोझमेरीच्या तेलाचे



**आयुर्वेद आणि विकार**

रोझमेरीचं तेल खूप उपयुक्त असतं. केस, त्वचेच्या आरोग्यासोबतच आपल्या सर्वांगिण आरोग्यासाठीही हे तेल उपयुक्त ठरू शकतं. या तेलाच्या उपयोगांविषयी...

✽ केसांच्या समस्या दूर करण्यासोबतच त्यांच्या वाढीसाठी ५० मिलीलीटर ॲप्रिकॉट किंवा ऑलिव्ह ऑईलमध्ये रोझमेरी तेलाचे ३० थेंब टाका. हे मिश्रण केस आणि स्काल्पला लावा. हे तेल रात्री लावल्यामुळे बरेच लाभ होऊ शकतील. या तेलामुळे कोंडा तसंच केसांच्या इतर समस्या दूर होऊ शकतील.

✽ पोटाच्या तक्रारी दूर करण्यासाठी ५० मिलीलीटर तिळाच्या तेलात रोझमेरी तेलाचे ३० थेंब टाका. झटपट आरामासाठी या मिश्रणाने पोटाच्या खालच्या भागावर मसाज करा.

✽ सर्दी-खोकल्यापासून आराम मिळवण्यासाठीही हे तेल उपयुक्त ठरतं. एका भांड्यात थोडं पाणी गरम करून घ्या. त्यात रोझमेरी तेलाचे चार ते पाच थेंब टाका. आता डोक्यावरून टॉवेल घेऊन या पाण्याची वाफ घ्या. तुम्हाला बरं वाटेल.

✽ डोकेदुखी, पाठदुखी, स्नायूंचं दुखणं, शारीरिक दुखणं तसंच मासिक पाळीच्या वेदना कमी करण्यासाठी ५० मिलीलीटर तिळाच्या तेलात रोझमेरी तेलाचे २५ थेंब टाका आणि या मिश्रणाने वेदना होणाऱ्या भागाला मसाज करा. तुम्हाला आराम मिळेल.

रोझमेरी किंवा इतर तेलांचा वापर करण्यासाठी डॉक्टरांचा सल्ला घ्या. कोणतेही सुगंधी तेल गुणकारी तेल नसतं हे लक्षात ठेवा.

# धोका हायटल हर्नियाचा

हायटल हर्नियामध्ये पोटाचा काही भाग अन्ननलिकेच्या समोरील बाजूला छातीतम ध्ये ढकलला जातो. यात पोटाचा भाग छातीच्या पिंजऱ्यातून डायाफ्रामच्या माध्यमातून निघतो. वाढत्या वयानुसार हायटल हर्निया होण्याची शक्यता वाढते. ५० वर्षांपेक्षा जास्त वयाच्या ५५ ते ६० टक्के व्यक्ती हायटस हर्नियाने ग्रस्त असल्याचे दिसून येते. यापैकी नऊ ते दहा टक्के व्यक्तींमध्ये याची लक्षणे आढळून येतात.

हायटल हर्निया जन्मापासून असतो किंवा वाढत्या वयात उद्भवू शकतो. पोटात दाब निर्माण झाल्यामुळेही या प्रकारचा हर्निया होऊ शकतो. लठ्ठपणा, गर्भधारणा, दीर्घकालीन बद्धकोष्ठता, सीओपीडी, आघात, शस्त्रक्रिया आणि अनुवंशिकता यासारखे इतर घटकदेखील त्यासाठी कारणीभूत ठरतात. याचे मुख्य कारण म्हणजे स्नायू कमकुवत होणे.


**कशामुळे होतो हायटस हर्निया?**

हायटल हर्नियामध्ये पोटाचा वरचा भाग 'डायफ्रामॅटिक ओपनिंग'मधून छातीत ढकलतो. त्यामुळे अन्ननलिकेच्या खालच्या टोकावरील स्नायूंच्या झडपेला धोका निर्माण होतो. झडप सैल आणि शिथिल झाल्यामुळे पोटातील घटक आणि आम्ल अन्ननलिकेत जाऊ शकते. त्यामुळे 'गॅस्ट्रोएसोफेजियल रिफ्लेक्स' हा रोग होतो. हायटल हर्नियाच्या सुरुवातीच्या टप्प्यात बहुतेकदा त्याची लक्षणे आढळून येत नाहीत आणि सामान्यतः औषधांनी त्यावर उपचार केले जातात. पुढच्या टप्प्यात मात्र त्यावर लॅपरोस्कोपिक फंडोप्लिकेशनच्या स्वरूपात शस्त्रक्रिया करावी लागते.

**लक्षणे कोणती?**

हायटल हर्नियाच्याची सुरुवातीला कोणतीही लक्षणे दिसून येत नाहीत. मात्र विकार वाढल्यावर खालील लक्षणे आढळतात.

✽ ढेकर येणे, उलट्या होणे
✽ छातीत जळजळ आणि ॲसिड रिफ्लक्स
✽ पोट किंवा छातीत दुखणे
✽ गिळण्यास त्रास होणे
✽ खूप पोट भरल्यासारखे वाटणे, विशेषतः जेवणानंतर
✽ काळ्या रंगाचा मल येणे किंवा रक्ताच्या उलट्या होणे, हे कधीकधी गॅस्ट्रोइंटेस्टाइनल ट्रॅक्टचे लक्षण असते.
✽ जुनाट खोकला आणि दम्यासारखी लक्षणे.
✽ आवाजात बदल होणे




**व्याधी विकार**
**डॉ. दिलीप शिरसाट**

**उपचार काय?**

जीवनशैलीत बदल हा उपचारांचा पहिला टप्पा आहे. बहुतेक हायटल हर्नियाची लक्षणे ही ॲसिड रिफ्लक्समुळे उद्भवत असल्याने, आहारातील बदल या समस्येत लक्षणीयरीत्या मदत करू शकतात. एकाच वेळी पोटभर न जेवता ठराविक अंतराने थोडे थोडे खाणे योग्य राहील. झोपण्यापूर्वी भरपेट आहार किंवा नाश्ता करणे टाळा. धूम्रपानाची सवय सोडणे हादेखील एक प्रभावी मार्ग आहे. छातीतील जळजळ टाळण्यासाठी जेवणानंतर लगेच झोपणे किंवा वाकणे टाळा. हायटल हर्नियाच्या उपचारांमध्ये औषधे महत्त्वाची भूमिका बजावतात. विशेषतः ॲसिड रिफ्लक्सशी संबंधित लक्षणे आढळल्यास याची मदत होते. अँटासिड्स सामान्यतः पोटातील ॲसिड निष्क्रिय करण्यासाठी वापरले जातात, तर एच२-रिसेप्टर ब्लॉकर्स हे ॲसिड उत्पादन कमी करण्यास मदत करतात. प्रोटॉन पंप इनहिबिटर (पीपीआय) हा आणखी एक प्रभावी पर्याय आहे, कारण ते ॲसिड उत्पादन पूर्णपणे रोखतात. त्यामुळे अन्ननलिकेचे कार्य सुरळीत राखता येते.

**शस्त्रक्रियेचा सल्ला कधी दिला जातो?**

रुग्णाला औषधे घेऊनही आराम मिळत नाही किंवा अन्ननलिकेतील अल्सर, श्वासनलिकेतील रिफ्लक्स, बॅरेट्स एसोफेगस आदींमध्ये गुंतागुंत निर्माण होते तेव्हा शस्त्रक्रियेची आवश्यकता भासते. अशा प्रकरणांमध्ये लॅप्रोस्कोपिक फंडोप्लिकेशन ही शस्त्रक्रिया केली जाते. ती त्यातल्या त्यात सर्वात सौम्य शस्त्रिक्रया मानला जाते. या शस्त्रक्रियेमुळे लक्षणे कमी होतात आणि भविष्यातील गुंतागुंतीदेखील टाळता येतात. फंडोप्लिकेशनमध्ये छातीतून हर्निएटेड घटक पोटात परत आणणे, सैल झालेली झडप घट्ट करणे आणि पोटाचे आवरण तयार करणे यांचा समावेश होतो. या प्रक्रियेत रुग्णांना कमी वेदना होतात. रुग्ण लवकर बरा होतो आणि शस्त्रक्रियेनंतर २४ ते ४८ तासांत त्यांना घरी सोडले जाते.

# सततच्या सर्दीकडे दुर्लक्ष नको



**आरोग्य विशेष**
**डॉ. कुंदन गायकवाड**

दर महिन्याला सर्दी, खोकला आणि फ्लू होत असेल तर त्याकडे दुर्लक्ष करू नका. दरवेळी नाकातून पाणी येणे, घसा खवखवणे आणि शिंका येणे हा केवळ हवामानाचाच परिणाम असेल असे नाही. वारंवार येणारी सर्दी हे एखाद्या गंभीर आजाराचे लक्षणदेखील असू शकते.

हवामान बदलल्यावर सर्दी होणे सामान्य आहे. परंतु दर काही आठवड्यांनी नाकातून पाणी येऊ लागले, घसा दुखू लागला किंवा शिंका येणे थांबले नाही तर प्रकरण गंभीर असू शकते. याचं सर्वात सामान्य कारण म्हणजे कमकुवत रोगप्रतिकारक शक्ती. शरीराची रोगप्रतिकारशक्ती कमकुवत झाली तर ती विषाणू आणि जीवाणूंशी लढण्यास असमर्थ असते. त्यामुळे वारंवार सर्दी होऊ शकते. खाण्याच्या वाईट सवयी, झोपेचा अभाव, ताणतणाव आणि व्यायामाचा अभाव ही याची मुख्य कारणे आहेत. बऱ्याच लोकांना धूळ, धूर, परागकण, पाळीव प्राण्यांचे केस किंवा कोणत्याही अन्नपदार्थांची ॲलर्जी असते. ॲलर्जीमुळे वारंवार सर्दीसारखी लक्षणे देखील उद्भवतात.

थंडीसोबत डोकेदुखी, जडपणा आणि चेहऱ्यावर दाब जाणवत असेल तर ते सायनस इन्फेक्शन असू शकते. त्यात नाकाच्या हाडांभोवती असलेली सायनस पोकळी सुजते. थंडीमध्ये वारंवार श्वास घेण्यास त्रास होत असेल तर ते दम्याचे लक्षण असू शकते. बेचदा लोक ती किरकोळ सर्दी आहे, असे समजून त्याकडे दुर्लक्ष करतात; परंतु उपचार न केल्यास परिस्थिती आणखी बिकट होऊ शकते. सर्दी झाल्यावर प्रत्येक वेळी अँटीबायोटिक्स घेण्याच्या सवयीमुळे रोगप्रतिकारशक्तीदेखील कमकुवत होऊ शकते. यामुळे आजार सहजपणे पकडू लागतात.


# हिप फ्रॅक्चर महिलांमध्ये अधिक

पुरुषांच्या तुलनेत महिलांमध्ये हिप फ्रॅक्चरचे प्रमाण अधिक आहे. हा वाढलेला धोका मुख्यत्वे हार्मोन्सम धील बदलांमुळे होतो. महिलांमध्ये हाडांची घनता कमी झाल्यामुळे हा धोका पहायला मिळतो. रजोनिवृत्तीनंतर इस्ट्रोजेन पातळीमध्ये अचानक घट झाल्यामुळे हाडांचे नुकसान होते, हाडांची रचना कमकुवत होते आणि हाडे तुटण्याची शक्यता वाढते, म्हणूनच, ५० वर्षांपेक्षा जास्त वयाच्या महिलांनी हाडांचे आरोग्य चांगले राखण्यासाठी योग्य खबरदारी घेणे आवश्यक आहे.

हिप फ्रॅक्चर हे बहुतेकदा हाडांमधील कमकुवतपणा, पडल्यामुळे किंवा किरकोळ दुखापतीमुळे होते. हिप फ्रॅक्चर झालेल्या व्यक्तीला दैनंदिन कामांसाठी इतरांवर अवलंबून रहावे लागते. लक्षणांमध्ये मांडीला अचानक वेदना होणे, पायावरील भार सहन न होणे, स्नायूंमधील ताठरता, जखम होणे आणि हाडांची घनता कमी होणे यांचा समावेश आहे. रजोनिवृत्तीनंतर महिलांमध्ये हे फ्रॅक्चर हे सामान्यतः इस्ट्रोजेनच्या कमतरते मुळे होऊ शकते. इस्ट्रोजेनची पातळी कमी झाल्यामुळे हाडे कमकुवत होतात. महिलांमध्ये नैसर्गिकरित्या पुरुषांपेक्षा हाडांची घनता कमी असते. त्यामुळे त्यांची हाडे अधिक नाजूक होतात आणि त्यांना हिप फ्रॅक्चर होण्याची शक्यता वाढते.

**शस्त्रक्रियेचा पर्याय किती गरजेचा?**

सुमारे वीस टक्के महिलांना रजोनिवृत्तीनंतर हिप फ्रॅक्चरचा धोका असतो. गेल्या दोन महिन्यांत, ५५ वर्षांपेक्षा जास्त वयाच्या २ ते ३ महिलांनी हिप रिप्लेसमेंट शस्त्रक्रिया केली आहे. उपचारांमध्ये शस्त्रक्रिया, त्यानंतर पुनर्वसन, फिजिओथेरपीचा समावेश आहे. सध्या संपूर्ण हिप रिप्लेसमेंटसाठी सुपरपथ हे प्रगत तंत्रज्ञान वापरले जाते. ही एक लहान छिद्र पाडून केली जाणारी प्रक्रिया असून यामध्ये स्नायू आणि ऊतींचे नुकसान कमी होते. त्यामुळे जलद रिकव्हरी, कमीत कमी वेदना आणि रुग्णालयात राहण्याचा कालावधी कमी होतो. या पद्धतीमुळे शस्त्रक्रियेनंतर हिप डिस्लोकेशन आणि संसर्ग होण्याची शक्यता कमी होते. स्नायू आणि स्नायूबंध (लिगामेंट्स) यांना इजा न झाल्याने हे तंत्र अधिक नैसर्गिकरित्या सांध्यांची हालचाल करण्यास मदत करते. त्यामुळे दीर्घकालीन परिणाम सुधारतात. शस्त्रक्रियेनंतर रुग्ण स्वतंत्रपणे चालणे आणि मांडी घालून बसणे यासारख्या सामान्य क्रियांदेखील करू शकतात.



**जाणून घ्या**
**डॉ. मेघा दळे**

**प्रतिबंधक उपाय**

प्रतिबंध हा सर्वोत्तम मार्ग असून आहारात कॅल्शियम आणि व्हिटॅमिन डीचा समावेश करणे, नियमित व्यायाम करणे, धूम्रपान आणि मद्यपानाचे व्यसन टाळणे आणि वयानुसार हाडांची घनता तपासून घेणे गरजेचे आहे. रजोनिवृत्तीनंतर महिलांनी डॉक्टरांच्या सल्ल्याने हाडांना बळकटी देणारी औषधे घ्यायला हवीत.




# एचआयव्हीवर इंजेक्शनची मात्रा

एचआयव्हीच्या उपचारांमध्ये वैद्यकीय शास्त्राला मोठे यश मिळाले आहे. अमेरिकेत एका इंजेक्शनला मान्यता देण्यात आली आहे. एचआयव्हीच्या या विषाणूला रोखण्यासाठी हे इंजेक्शन वर्षातून दोनदा दिले जाऊ शकते. आरोग्यतज्ज्ञ एचआयव्ही विरुद्धच्या लढाईत हे एक महत्त्वाचे पाऊल मानत आहेत.

**नवे संशोधन**
**डॉ. गिरीश कुलकर्णी**

अमेरिकेच्या 'एफडीए' विभागाने 'गिलियड सायन्सेस'च्या लेनाकापावीर या इंजेक्शनला मान्यता दिली आहे. हे 'प्री-एक्सपोजर प्रोफिलॅक्सिस' किंवा 'पीईपी'च्या स्थितीत दिले जाते. दर सहा महिन्यांनी एक डोस देऊन एचआयव्ही संसर्ग रोखू शकणारे हे पहिलेच इंजेक्शन आहे. चाचणी दरम्यान हे इंजेक्शन संसर्ग रोखण्यासाठी ९९.९ टक्के प्रभावी असल्याचे दिसून आले. अशा प्रकारे कंपनीकडून दोनदा क्लिनिकल चाचण्या घेण्यात आल्या. पहिल्या चाचणीत दोन हजारांहून अधिक महिलांचा समावेश होता. महिलांवर या औषधाच्या क्लिनिकल चाचणीत शंभर टक्के प्रभावी परिणाम दिसून आले. दुसऱ्या चाचणीत पुरुषांचा समावेश होता. त्यापैकी फक्त दोघांमध्ये संसर्ग आढळून आला. एचआयव्ही रोखण्यासाठी हे औषध ९९.९ टक्के प्रभावी असल्याचे सिद्ध झाले. आजवर एचआयव्ही टाळण्यासाठी दररोज गोळ्या किंवा दर महिन्याला इंजेक्शन घेण्याची आवश्यकता होती. आता वर्षातून केवळ दोन इंजेक्शन्स घेऊन भागणार आहे. पण नवीन एचआयव्ही प्रतिबंधक इंजेक्शन 'लेनाकापावीर' खूप महाग आहे. त्याचा वार्षिक डोस २८ हजार डॉलर्सपेक्षा जास्त आहे. तो सामान्य माणसाच्या आवाक्याबाहेर आहे. आरोग्यतज्ज्ञांच्या मते, 'लेनाकापावीर' वैद्यकीय क्षेत्रात एक मैलाचा दगड ठरू शकतो.

# मधुमेहींसाठी ब्रेडचे पर्याय

मधुमेहींच्या खाण्यापिण्यावर बरीच बंधनं येतात. कर्बोदकांचं अधिक प्रमाण असणारे, अधिक कॅलरीचे गोड पदार्थ त्यांना खाता येत नाहीत. अधिक कर्बोदकं असणाऱ्या पदार्थांमध्ये ब्रेडचाही समावेश होतो. मधुमेहींनाही ब्रेड खायला मनाई केली जाते. मात्र ब्रेड खायची वेळ आलीच किंवा एखाद्या वेळी ब्रेड खावासा वाटला तर कोणत्या ब्रेडची निवड करावी, याविषयी...



**काय खावं?**

✽ ब्रेड घेण्याआधी त्यातल्या पोषणमूल्यांबाबत जाणून घेणं गरजेचं आहे. त्यामुळे पाकिटातल्या पोषणमूल्यांची माहिती वाचून मगच ब्रेड खरेदी करा.

✽ अमेरिकन डायबेटिक असोसिएशनच्या म्हणण्यानुसार मधुमेहींनी पूर्ण धान्याचा किंवा गव्हाचा ब्रेड खावा. मैद्याचा पांढरा ब्रेड शक्यतो टाळावा.

✽ ओट्स, जवस आणि गव्हाचा पीठा ब्रेड मिळतो. या ब्रेडमध्ये फायबरचं प्रमाण बरंच जास्त असतं. यात कर्बोदकंही कमी प्रमाणात असतात. या ब्रेडची चवही चांगली असते. या ब्रेड मुळे तुमची कर्बोदकं खाण्याची इच्छा कमी होऊ शकते.

✽ फायबरयुक्त गव्हाचा ब्रेडही मधुमेहींसाठी चांगला पर्याय आहे. पण तुम्ही दर्जेदार गव्हाचा ब्रेड घ्या. या ब्रेडमुळे पोट बराच काळ भरलेलं रहातं. यामुळे वजन कमी करण्याची प्रक्रियाही सुलभ होते.

✽ मधुमेहींसाठी मल्टीग्रेन ब्रेडचा पर्यायही उपलब्धआहे. मल्टीग्रेन ब्रेडमधल्या फायबरमुळे पोट बराच काळ भरलेलं रहातं. चांगल्या कंपनीचा मल्टीग्रेन ब्रेड रक्तातलं साखरेचं प्रमाण नियंत्रणात ठेऊ शकतो.

✽ ग्लुटन फ्री ब्रेड आंधळेपणाने विकत घेऊ नका. कारण ग्लुटन फ्री ब्रेडमध्ये कर्बोदकांचं प्रमाण अधिक असू शकतं. ग्लुटनची ॲलर्जी असेल तरच ग्लुटन फ्री ब्रेड खरेदी करा.

# सतत इयरफोन घातल्यामुळे...

सध्या बाजारात वेगवेगळ्या प्रकारचे हेडफोन, ईयरफोन पहायला मिळतात. तरुण मंडळी कानात ईयरफोन घालून गाणी ऐकत किंवा चित्रपट बघत बसतात. पण अशा प्रकारे सतत कानात हेडफोन घालून ठेवल्यामुळे बहिरेपणा येऊ शकतो. बरेच तज्ज्ञ डॉक्टर याबाबत इशारा देतात. कानात ईयरफोन घालून बराच काळ मोठ्या आवाजात गाणी ऐकल्यामुळे श्रवणदोष निर्माण होऊ शकतात. खरं तर ईयरफोन्सपेक्षाही मोठ्या आवाजामुळे कानाला त्रास होतो. ईयरफोन्स घातल्यानंतर आवाज थेट कानांमध्ये जातो. मोठ्या आवाजामुळे कानांचे पडदे फाटू शकतात.



**कुठे चुकतो आपण?**

तुम्ही ईयरफोनद्वारे किती वेळ, किती काळ आणि किती मोठ्या आवाजात ऐकता यावर कानांचं आरोग्य अवलंबून असतं. ईयरफोनच्या वापरामुळे श्रवणशक्तीवर होणाऱ्या परिणामांबाबत जागतिक स्तरावर बराच अभ्यास करण्यात आला आहे. या अभ्यासातून ईयरफोनच्या वापराचे काही दुष्परिणाम समोर आले आहेत. ईयरफोनच्या सततच्या वापरामुळे टिनिटस नावाचा विकार होऊ शकतो. टिनिटस हे कानाची नस दुखावली गेल्याचं लक्षण मानलं जातं. ईयरफोन कानात घातले जातात तर हेडफोन्स कानांवर लावले जातात. त्यामुळे ईयरफोनऐवजी हेडफोन्सचा वापर करणं योग्य ठरतं. टिनिटस या विकारात कानात घंटा वाजल्यासारखा आवाज येतो. या विकारावर वेळीच उपचार न केल्यास त्रास अधिक वाढत जातो.

# उदबत्तीचा धूर सिगारेटपेक्षाही घातक

रोज सकाळी आणि संध्याकाळी देवाजवळ दिवा लावला जातो. धूप, उदबत्ती लावली जाते. पण यामुळे नकळत आरोग्याला मोठे नुकसान होत आहे. अगरबत्ती लावल्यानंतर म्हणजे जाळल्यानंतर त्यातून निघणारा धूर आरोग्यासाठी घातक ठरू शकतो. उदबत्ती आणि धूपात वापरल्या जाणाऱ्या 'पॉलीएरोमॅटिक हायड्रोकार्बन्स' (पीएएच) चा फुफ्फुसांवर खूप वाईट परिणाम होतो.



**चर्चेत**
**डॉ. अजिंक्य बोऱ्हाडे**

उदबत्तीतून निघणाऱ्या धुराचा शरीराच्या पेशींवर वाईट परिणाम होतो आणि तो सिगारेटच्या धुरापेक्षा जास्त विषारी असतो. उदबत्तीच्या धुरात असलेले रसायन फुफ्फुसांच्या पडद्यांमध्ये संसर्ग निर्माण होऊ शकतात. त्याच्या धुराच्या सतत संपर्कात राहिल्याने फुफ्फुसांच्या पेशींमध्ये ॲलर्जी होऊ शकते.

**त्वचेची ॲलर्जी**

धूप आणि उदबत्तीचा वापर जास्त काळ केल्याने डोळे आणि त्वचेशी संबंधित ॲलर्जी होऊ शकते. या गोष्टी जाळल्याने निघणाऱ्या धुरामुळे डोळ्यांची जळजळ होते, तर संवेदनशील त्वचा असलेल्या लोकांना या धुराच्या संपर्कात येताच त्वचेला खाज येऊ शकते.

**मेंदूवर वाईट परिणाम**

सुगंधित उदबत्ती आणि धुपामधून निघणाऱ्या रासायनिक धुराचा व्यक्तीच्या मानसिक आरोग्यावर वाईट परिणाम होऊ शकतो. या गोष्टींचा दीर्घकाळ वापर केल्याने डोकेदुखी, एकाग्रतेचा अभाव, स्मृतिभ्रंश आणि अल्झायमर सारख्या आजारांचा धोकादेखील वाढू शकतो.

**नवसंशोधन**

## लाळेची किफायतशीर चाचणी



कर्करोगाच्या निदानाची प्रक्रिया खूप गुंतागुंतीची आणि खर्चिक असते. पण शास्त्रज्ञांच्या प्रयत्नांमुळे कर्करोगाचं निदान किफायतशीर अशा लाळेच्या चाचणीने होऊ शकतं. या अत्यंत किफायतशीर अशा लाळेच्या चाचणीमुळे ह्युमन पॅपिलोमा १६ विषाणूचं निदान करता येतं. हा विषाणू घसा, तोंडाच्या कर्करोगाला कारणीभूत ठरू शकतो. या चाचणीमुळे तोंडाच्या तसंच घशाच्या कॅन्सरचं वेळेत निदान होऊ शकतं. अमेरिकेतल्या ड्यूक विद्यापीठातल्या शास्त्रज्ञांनी याबाबत संशोधन केलं आहे. हे तंत्रज्ञान इतर काही विकारांच्या निदानासाठी उपयुक्त ठरू शकतं, असंही शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे.

**दंतारोग्य**

## ओव्याने दूर करा तोंडाच्या समस्या



हिरड्या सुजणं, तोंडाची दुर्गंधी या मौखिक आरोग्याशी संबंधित सर्वसाधारण समस्या आहेत. तोंड स्वच्छ ठेवलं नाही तर दातांमध्ये साठलेलं अन्न कुजून दुर्गंध येऊ लागतो. ही समस्या दूर करण्यासाठी बरेच उपाय केले जातात. ओव्याच्या पाण्याने तोंडाची दुर्गंधी दूर होऊ शकते. यासाठी थोड्या पाण्यात ओवा घालून उकळून घ्या. या पाण्याने चूळ भरल्यामुळे तोंडाच्या दुर्गंधीची समस्या कमी होऊ शकते. हिरड्यांमधून रक्त येत असेल तर ओव्याच्या तेलाचे काही थेंब गरम पाण्यात घालून या पाण्याने चूळ भरल्यामुळे हिरड्यांमधलं रक्त थांबू शकतं.

**जपणूक त्वचेची**

## त्वचेवर दिसतात परिणाम



शरीरात एखाद्या पोषक घटकाची कमतरता असल्यास त्याची लक्षणं दिसू लागतात. त्वचा पांढरी पडणं, त्वचेवर चट्टे पडणं, पिंपल्स येणं ही एखाद्या पोषक घटकाच्या कमतरतेची लक्षणं असू शकतात. त्वचा निस्तेज, पांढरट दिसणं हे बी १२ या जीवनसत्त्वाच्या कमतरतेचं लक्षण असू शकतं. त्वचेवर पुरळ किंवा पिंपल्स येत असतील तर हे 'अ' आणि 'ई' या जीवनसत्त्वांच्या कमतरतेचं लक्षण ठरू शकतं. त्यामुळे त्वचेच्या समस्या असतील तर या जीवनसत्त्वांच्या कमतरतेची तपासणी नक्की करून घ्या.

**आजीबाईचा बटवा**

## नैराश्यावर प्रभावी उपाय



सध्या अनेकांना नैराश्याने ग्रासल्याचं पहायला मिळतं. नैराश्याच्या या समस्येवर बरेच उपचार करावे लागतात. पण काही घरगुती उपायांनी तुम्हाला बरं वाटू शकतं. हळद आणि लिंबाच्या मिश्रणामुळे नैराश्य तसंच इतर मानसिक आजारांमध्ये बरं वाटू शकतं. यासाठी एका भांड्यात चार कप पाणी घ्या. त्यात एका लिंबाचा रस घाला. यात दोन चमचे हळद आणि चार चमचे मध घाला. हे सर्व घटक नीट मिसळून घ्या. दिवसातून दोन वेळा हे पाणी प्या. यामुळे लाभ होतील. हळदीतल्या पोषक घटकांमुळे नैराश्याची तीव्रता कमी होऊ शकते.

